# वार्षिक अहवाल

# २०२२ – २०२३





## आदिम संस्कृती अभ्यास,संशोधन विकास केंद्र

(रजि.नं. महा १५१९ /२०११/पुणे)

त्रिमूर्ती भवन,जुन्नर फाटा,घोडेगाव ता.आंबेगाव जि.पुणे - ४१० ५०९ संपर्क – ९४०५८५३४७८
ई-मेल - adimsanstha2012@gmail.com संकेतस्थळ - adimresearch.org

# कार्यकारी मंडळ

| अ.क्र. | सदस्याचे नाव | पद |
|---|---|---|
| १. | प्रा. शरद जनार्दन जावडेकर | अध्यक्ष |
| २. | प्रा.हनुमंत तथा राजीव भीमराव जोशी | उपाध्यक्ष |
| ३. | डॉ. अमोल पोपट वाघमारे | सचिव |
| ४. | गिरीश दगडूलाल गांधी | सदस्य |
| ५. | सुवर्णा अशोक पेकारी | सदस्य |
| ६. | प्रा.डॉ.हनुमंत लक्ष्मण भवारी | सदस्य |
| ७. | अड .नाथा कुमाजी शिंगाडे | सदस्य |

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | घटक | पान क्र. |
|---|---|---|
| १. | प्रास्ताविक | ४ |
| २. | साक्षरता व शिक्षण विषयक कार्यक्रम | ५ – १५ |
| ३. | संशोधनात्मक कार्य | १६ – २६ |
| ४. | आरोग्य विषयक कार्य | २७ – ३३ |
| ५. | आरोग्यवर्धिनी उपकेंद्र सक्षमीकरण प्रकल्प | ३४ – ३५ |
| ६. | विशेषदिनानिमित्ताचे कार्यक्रम | ३६ – ३९ |
| ७. | मदतीचे व इतर कार्य | ४० – ४२ |
| ८. | वर्तमान पत्रातील कात्रणे | ४३ – ४५ |

# प्रास्ताविक

आदिम संस्कृती अभ्यास, संशोधन व मानव विकास केंद्र या संस्थेचा सन २०२२-२३ चा वार्षिक अहवाल, प्रकाशित करताना संस्थेच्या कार्यकारी मंडळास नक्कीच आनंद होत आहे. जवळपास १० वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या संस्थेच्या वतीने अनेक रचनात्मक व विधायक कार्यक्रम घेण्यात आलेले आहेत.

संस्थेच्या मुख्य उद्देशानुसार संस्थेने आदिवासी, श्रमिक जनतेसाठी त्यांचे मुख्य प्रश्न समजून घेऊन त्यांच्यावर संशोधन करून काही दुर्लक्षित प्रश्न संशोधनाच्या पातळीवर शास्त्रीय पद्धतीने समोर आणण्याचा प्रयत्न केला. सन २०२२ -२३ मध्ये संस्थेने मुख्यतः शिक्षण, साक्षरता, आरोग्य विषयक कामे केली आहेत. याबरोबरच काही संशोधनात्मक काम सुद्धा यावर्षी करण्यात आले. या वर्षभरात झालेल्या कार्याचा संक्षिप्त रूपामध्ये वार्षिक अहवाल आम्ही सादर करत आहोत.

आपल्या सर्वांच्या सहकार्यातून आम्ही मागील वर्षभरात काम करू शकलो. आपणा सर्वांचे सहकार्य या पुढील काळातही आम्हाला आवश्यक आहे. याबरोबरच, संस्थेच्या वतीने पुढील काळामध्ये जे संशोधनात्मक व रचनात्मक कार्य केले जाणार आहे, त्या कार्याला आपल्या सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे.

आपणा सर्वांचे मनःपूर्वक आभार व आपल्या सूचना व मार्गदर्शन पुढील काळात संस्थेला आवश्यक आहे.

आपलेच,

**कार्यकारी मंडळ**

आदिम संस्कृती अभ्यास, संशोधन व मानव विकास केंद्र

# साक्षरता व शिक्षण विषयक कार्यक्रम

१. ग्रंथालय स्थापना

२. साक्षरता वर्ग

३. अभ्यासिका

४. बालमंच

# १. ग्रंथालय स्थापना

राज्य साधन केंद्र, पुणे या संस्थेच्या वतीने आदिम संस्थेला काही पुस्तके प्राप्त झालेली होती. तसेच जुनी पुस्तकांची कपाटे हि देखील उपलब्ध झालेली होती. त्यानुसार विविध गावांमध्ये व मुला-मुलींच्या वसतिगृहांमध्ये काही नवीन ग्रंथालये सुरु करण्याचे प्रयत्न संस्थेच्या वतीने करण्यात आले. सन २०२१ - २२ मध्ये, काही गावांमध्ये ग्रंथालये सुरु करण्यात आलेली होती. त्याबाबतची सविस्तर माहिती मागील वर्षाच्या अहवालामध्ये आम्ही सादर केलेली आहे. यावर्षी दि.१५/०४/२०२२ रोजी शिवशंकर वसतिगृह, घोडेगाव येथे ग्रंथालय सुरु केले. यावेळी वसतिगृहाचे गृहपाल लांडे, वसतिगृहातील विद्यार्थी उपस्थित होते. या ग्रंथालयामुळे येथील ६० निवासी विद्यार्थ्यांना वाचनासाठी पुस्तके उपलब्ध झाली. मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण होण्यासाठी हे ग्रंथालय उपयुक्त ठरत आहे, मुले नियमित पुस्तकांचे वाचन करत आहेत, अशी प्रतिक्रिया येथील गृहपाल यांनी दिली आहे.



# २. साक्षरता वर्ग

## १. साक्षरता वर्ग - डहाणूकर कॉलनी, कर्वेनगर, पुणे

सन २०२१ – २२ मध्ये रोटरी क्लब मेट्रो, पुणे यांच्या सहकार्याने व संस्थेच्या स्थानिक संयोजनातून पुणे शहरात प्रथमच वस्तीपातळीवर साक्षरता वर्ग सुरु करण्यात आला होता. या साक्षरता वर्गाचे कामकाज २०२२ – २३ मध्ये देखील सुरु होते. हा साक्षरता वर्ग जवळपास १ वर्षभर सुरु होता. या साक्षरता वर्गात इंद्रायणी इंगळे हि विद्यार्थिनी अध्यापनाचे काम करत होती. या वर्गात शिक्षण घेणाऱ्या महिला या मुख्यतः पुणे शहरात घरकाम करणाऱ्या होत्या. या वर्गात अखेर पर्यंत १५ महिला साक्षर झाल्या.

या साक्षरता वर्गात लेखन,वाचन, अंकगणित याबरोबरच आरोग्य साक्षरतेविषयी २ कार्यक्रम पार पाडले.यामध्ये मुख्यतः महिलांच्या आरोग्य विषयी साधन व्यक्तींनी मार्गदर्शन केले. याबरोबरच महिलांच्या काही खेळाच्या स्पर्धा घेऊन वर्गामध्ये आनंद निर्माण करण्याचे काम केले. साक्षरता वर्गामध्ये विविध विशेष दिन साजरे करून देशातील महापुरुषांची माहिती यानिमित्ताने देण्यात आली. फेब्रुवारी २०२२ ते जानेवारी २०२३ पर्यंत या साक्षरता वर्गाचे नियमित आयोजन दुपारी ३ ते ५ या वेळेमध्ये होत होते. जानेवारी २०२३ च्या पहिल्या आठवड्यात साक्षरता वर्गाचा अभ्यासक्रम पुर्ण केलेल्या महिलांची मुलभूत साक्षरता परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेमध्ये उतीर्ण झालेल्या महिलांना दि.२५ जानेवारी २०२३ रोजी साक्षरता विषयक प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी रोटरी क्लब पुणे मेट्रोचे व आदिम संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.





## २. साक्षरता वर्ग – आमोंडी, ठाकर वस्ती

आंबेगाव तालुक्यात वास्तव्यास असणाऱ्या आदिवासी जमातींपैकी ठाकर आदिवासी समुदाय हा आजतागायत शिक्षण,आरोग्य व इतर मुलभूत सोयीसुविधांपासून वंचित राहिलेला आहे. हे संस्थेने ओळखून शिक्षण हा मुलभूत प्रश्न लक्षात घेता तालुक्यातील आमोंडी येथील ठाकर वस्तीमध्ये साक्षरता वर्ग सुरु करण्यात आला होता. या साक्षरता वर्गाला रोटरी क्लब कोथरूड, पुणे यांचे सहकार्य लाभले होते.

या साक्षरता वर्गात स्वयंसेवक म्हणून शिकवण्याचे काम करणाऱ्या शारदा केदारी व त्यांना साक्षरता वर्गात सहकार्य करणाऱ्या त्यांच्या सहकारी यांचे प्रशिक्षण एप्रिल २०२२ च्या पहिल्या आठवड्यात संस्थेच्या वतीने घेण्यात आले. या प्रशिक्षण कार्यक्रमात मुख्यतः साक्षरता वर्गाचे आयोजन व वर्गात करावयाचे अध्यापन याविषयी माहिती व कौशल्य सांगण्यात आली.

या साक्षरता वर्गाचे औपचारिक उद्घाटन दि.१८/०४/२०२२ रोजी करण्यात आले. याप्रसंगी रोटरी क्लब कोथरूड, पुणे व आदिम संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. या उद्घाटन प्रसंगी निरक्षर महिलांना शैक्षणिक साहित्य वितरीत करण्यात आले. या वर्गात सुमारे २० महिला साक्षर झाल्या आहेत व हा वर्ग मार्च २०२३ पर्यंत सुरु होता.

या वर्गात लेखन,वाचन, अंकगणित याबरोबरच आरोग्य साक्षरतेविषयी २ कार्यक्रम पार पाडले.यामध्ये मुख्यतः महिलांच्या आरोग्य विषयी साधन व्यक्तींनी मार्गदर्शन केले. याबरोबरच महिलांच्या काही खेळाच्या स्पर्धा घेऊन वर्गामध्ये आनंद निर्माण करण्याचे काम केले. साक्षरता वर्गामध्ये विविध विशेष दिन साजरे करून देशातील महापुरुषांची माहिती यानिमित्ताने देण्यात आली.






**विविध मार्गदशन व खेळाच्या स्पर्धा**



## ३. साक्षरता वर्ग – चास, ठाकरवस्ती

संस्थेने आदिवासी ठाकर समुदायाच्या अभ्यासांती निरीक्षणातून हा दुसरा साक्षरता वर्ग चास येथील ठाकरवस्तीमध्ये सुरु करण्यात आला होता. या साक्षरता वर्गास रोटरी क्लब कोथरूड, पुणे यांचे सहकार्य लाभले होते.

या वर्गात लेखन,वाचन, अंकगणित याबरोबरच आरोग्य साक्षरतेविषयी २ कार्यक्रम पार पाडले.यामध्ये मुख्यतः महिलांच्या आरोग्य विषयी साधन व्यक्तींनी मार्गदर्शन केले. याबरोबरच महिलांच्या काही खेळाच्या स्पर्धा घेऊन वर्गामध्ये आनंद निर्माण करण्याचे काम केले. साक्षरता वर्गामध्ये विविध विशेष दिन साजरे करून देशातील महापुरुषांची माहिती यानिमित्ताने देण्यात आली.






## ४. साक्षरता वर्ग – शिनोली, ठाकरवस्ती

संस्थेने आदिवासी ठाकर समुदायाच्या अभ्यासांती निरीक्षणातून हा तिसरा साक्षरता वर्ग शिनोली येथील ठाकरवस्तीमध्ये सुरु करण्यात आला होता. या साक्षरता ईनरव्हील क्लब ऑफ निगडी प्राईड यांचे सहकार्य लाभले होते.

या साक्षरता वर्गात स्वयंसेवक म्हणून शिकवण्याचे काम करणाऱ्या मनीषा केवाळे यांनी केले होते. या साक्षरता वर्गातून १० महिलांना साक्षर करण्यात आले होते.

या वर्गात लेखन,वाचन, अंकगणित याबरोबरच आरोग्य साक्षरतेविषयी २ कार्यक्रम पार पाडले.यामध्ये मुख्यतः महिलांच्या आरोग्य विषयी साधन व्यक्तींनी मार्गदर्शन केले. याबरोबरच महिलांच्या काही खेळाच्या स्पर्धा घेऊन वर्गामध्ये आनंद निर्माण करण्याचे काम केले. साक्षरता वर्गामध्ये विविध विशेष दिन साजरे करून देशातील महापुरुषांची माहिती यानिमित्ताने देण्यात आली.



# ३. अभ्यासिका

घोडेगाव, तालुका आंबेगाव येथे संस्थेचे कार्यालय आहे. हे कार्यालय भाडेतत्त्वावर घेण्यात आले आहे. या इमारती शेजारीलच एक छोटीशी खोली ही संस्थेने भाडेतत्त्वावर घेतली आहे व या ठिकाणी स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या होतकरू आणि गरीब विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका सुरु करण्यात आलेली आहे.

घोडेगाव हे तालुक्याचे ठिकाण आहे. या ठिकाणी विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यासाठी व्यवस्थितपणे अभ्यासिका नसल्याने, विद्यार्थ्यांची गैरसोय होत होती. ही गैरसोयी लक्षात घेऊन संस्थेने ही अभ्यासिका सुरू केलेली आहे. या अभ्यासिकेचे औपचारिक उद्घाटन २० नोव्हेंबर २०२२ रोजी झाले. या अभ्यासिकेचे अंतर्गत फर्निचर चे काम करण्यासाठी, जवळपास एक लाख रुपये खर्च अपेक्षित होता. यावेळी ललित कला मंदिर, सार्वजनिक विश्वस्त निधी,पुणे या संस्थेने काही रक्कम दिली. व संस्थेच्या हितचिंतकांकडून काही रक्कम देणगी रूपातून गोळा करून या अभ्यासिकेमधील फर्निचर चे काम पूर्ण करण्यात आले. या अभ्यासिकेसाठी खुर्च्या सतकरम फाउंडेशन यांनी उपलब्ध करून दिल्या आहेत. आजमीतीस संस्थेमध्ये एकूण २० विद्यार्थी अभ्यास करत आहेत. या अभ्यासिकेत अभ्यास करणारा एक विद्यार्थ्याची नुकतीच पोलीस शिपाई पदी निवड झालेली आहे.







# ५. बालमंच

लहान मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन रुजला जावा व त्यासोबतच मुलांच्या कला गुणांना वाव मिळावा यासाठी. संस्थेच्या वतीने बालमंच या प्रकल्पाचे आयोजन करण्यात आले होते. या बालमंचाच्या माध्यमातून हसत खेळत शिक्षण आणि यासोबतच जीवन कौशल्ये शिकविणे , त्यांना अभ्यासामध्ये गोडी निर्माण करणे, त्यांची बौद्धिक क्षमता वाढणे यासाठी या प्रकल्पाचे आयोजन करण्यात आले होते. ज्याद्वारे मुले टीव्ही आणि मोबाईल मध्ये न गुंतता त्यांना हा एक वेगळा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला होता.

## १. चाफा बालमंच, फलोदे

लहान मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन रुजला जावा व त्यासोबतच मुलांच्या कला गुणांना वाव मिळावा यासाठी. संस्थेच्या वतीने बालमंच या प्रकल्पाचे आयोजन करण्यात आले होते. हा बालमंच नोव्हेंबर २०२२ ते मार्च २०२३ या दरम्यान चालविला गेला. या बालमंचाच्या माध्यमातून हसत खेळत शिक्षण आणि यासोबतच जीवन कौशल्ये शिकविणे , त्यांना अभ्यासामध्ये गोडी निर्माण करणे, त्यांची बौद्धिक क्षमता वाढणे हे मुख्यत: प्रकल्पाचे उद्देश होते. या बालमंच मध्ये गावातील रेखा शेळके यांनी संस्थेच्या वतीने प्रशिक्षणाचे कार्य केले. या बालमंचात एकूण २५ मुले सहभागी होती.
या बालमंचाच्या माध्यमातून पुढील उपक्रम घेण्यात आले,

- मन बदलण्यासाठी एखादा छान असा खेळ जसे तळ्यात मळ्यात, उंच उंच होडी त्यामध्ये किती माणसे असा खेळ घेऊन उत्साह निर्माण करण्यात येत होता.
- मुलांच्या आवडीनुसार म्हणजेच, भाषा, गणित, चित्रकला अशा प्रकारचे विषय घेऊन शिकवले जात होते. लहान मुलांसाठी चित्र ओळख (उदा. एखादया पाण्याचे चित्र दाखवून ओळखण्यास सांगणे. किंवा फळे-फुले इत्यादी.) किंवा चित्र काढणे, चित्र रंगवणे.
- पाठ्यपुस्तकामधील कविता म्हणणे, त्या मध्ये कवितेतील ताल-लय कसा असावा, हे सांगितले जात होते. त्या मध्ये लहान गटातील मुलांना, मुळाक्षरे, बाराखडी, अंकवाचन घेतले जात होते.
- गोष्टी सांगताना उपस्थित मुलांच्या सहाय्याने नाटकाच्या माध्यमातून गोष्टी, शालेय पाठ, कविता या शिकवले जात होते. यामुळे मुलांमधील उत्साह अधिक प्रमाणात वाढविला गेला.
- विद्यार्थ्यांचा सह्भाग वाढविण्यासाठी वेगवेगळे सण, जयंती साजरी केली गेली, त्यानिमित्त अनेक कार्यक्रम, स्पर्धा आयोजित करून विद्यार्थ्यांचा सहभाग वाढीस लागला. जसे कि वृक्ष लागवड, परिसर स्वच्छता, सावित्रीबाई फुले जयंती, महापरिनिर्वाण दिन, होळी सारखे सण इत्यादी उपक्रम आगळ्या – वेगळ्या पद्धतीने घेऊन मुलांच्या कला – गुणांना वाव देण्यात आला.

एकूणच या बालमंच उपक्रमाच्या माध्यमातून लहान मुलांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत झाली.सहभागी मुलांमध्ये उल्लेखनीय बदल दिसून आले.

- मुलांमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली आहे, सकारात्मक विचार करु लागले आहेत.
- कल्पना क्षमतेत वाढ झाली, यासोबतच अनेक मुल हि कलेमध्ये पारंगत झालेली आहेत. त्यांच्या सुप्त गुणांना येथे वाव मिळाला आहे.
- अभ्यासाकडे एका नव्या दृष्टीने पाहिले गेले, त्यांचा मुलांना खूप फायदा झाला. मुलांमध्ये अनेक नैतिक मूल्ये प्रस्थापित झाली, त्यांच्यात आत्मविश्वासामध्ये वाढ झालेली आहे.





## २. जास्वंद बालमंच, जांभोरी (नांदूरकीचीवाडी)

लहान मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन रुजला जावा व त्यासोबतच मुलांच्या कला गुणांना वाव मिळावा यासाठी. संस्थेच्या वतीने बालमंच या प्रकल्पाचे आयोजन करण्यात आले होते. हा दुसरा बालमंच जांभोरी येथील नांदुरकिचीवाडी येथे सुरु करण्यात आला. नोव्हेंबर २०२२ ते मार्च २०२३ या दरम्यान नांदुरकीचीवाडी तेथे आदिम संस्थेच्या वतीने बालमंच हा प्रकल्प राबविण्यात आला. संस्थेच्या वतीने गाव पातळीवर मुलांसाठी सुरु केलेला हा प्रकल्प अतिशय महत्वाचा ठरला.

या बालमंचाच्या माध्यमातून हसत खेळत शिक्षण आणि यासोबतच जीवन कौशल्ये शिकविणे , त्यांना अभ्यासामध्ये गोडी निर्माण करणे, मूल्य शिक्षण, त्यांची बौद्धिक क्षमता वाढवणे, व्यक्तिमत्व विकास घडवून आणणे हे मुख्यतः प्रकल्पाचे उद्देश होते. या बालमंच मध्ये गावातील वैशाली केंगले यांनी संस्थेच्या वतीने शिकवण्याचे कार्य केले. या बालमंचात एकूण २५ मुले सहभागी होती.

या बालमंचाच्या माध्यमातून पुढील उपक्रम घेण्यात आले,

- सहभागी मुलांना प्राथमिक स्तरावर अंकगणित, मुळाक्षरे लेखन व वाचन, शुद्धलेखन, हसत खेळत गणित शिकविणे, तळ्यात मळ्यात रिंगणात माणसे किती पाहुणा ओळखा (भाषिक खेळ) मुलांकडून जास्तीत जास्त वाचन करून घेणे नेहमीप्रमाणे शेवटी आज काय शिकले कोणाला काय काय आवडले. लहान मुलांना त्यांच्या वयाप्रमाणे गाणी शिकवणे, गोष्टी शिकवणे ते मुलांना आवडते. उदा. केशवा माधवा, देवा, तुझे किती सुंदर आकाश इतनी शक्ती हमे देना दाता, खरा तो एकची धर्म इत्यादी घेतो वर्गाची स्वच्छता, फलक लेखन, गृहपाठ तपासणे, वाचन :- वाचनामध्ये पाठ्यपुस्तके, गोष्टीची पुस्तके वर्तमानपत्र वाचण्यास देणे वाचनामध्ये सहभागी करुन घेणे, क्षमतेनुसार वाचण्यास देणे लहान मुलांना मुळाक्षरे, बाराखडी वाचायला देतो.. मुळाक्षरांमध्ये लहान मुलांना सराव देणे, वाचून घेणे चित्रावरून अक्षर शिकवणे. मुलांना रोज नविन नविन गोष्टी गाणी शिकवणे, ती मुलांना आवडतात, वेगवेगळ्या गोष्टी सांगणे त्यांचे तात्पर्य सांगणे गोष्टीवर प्रश्न विचारणे. फळ फुलांविषयी माहीती सांगणे, केलेंडवर संख्या दाखवणे वारांचे नाव गाण्यातून शिकविणे घड्याळात वाजले किती शिकविणे, परिसरातील आवाज ओळखणे शिकवताना साहित्य वापरणे, उदा. मणी दगड, फुले, पाने, लहान मुलांना गप्पामध्ये प्रश्न विचारणे चित्र काढणे, कागदापासून वस्तु बनविणे, आदी.
- खेळ घेताना सर्व मुल सहभागी होतात, जी मुले भाषण, गायन, गोष्टीत भाग घेत नाही खेळात सहभागी होतात. लहान मुलांशी गप्पा मारणे गप्पांवर प्रश्न विचारणे मुलांना गाणी गोष्टी शिकविणे, प्रार्थना स्पष्ट उच्चारांसह शिकवणे, परिसरातील आवाज ओळखणे आवाजाची दिशा ओळखणे, मुलांचे खेळ घेणे, मुलांना स्वतःचे नावे, नाती, वस्तु, क्रियापदे सर्वनाम विचारणे साधे शब्द, मुलांना आठवडयातून एकदा चित्रकला शिकविणे, कागदांपासून वस्तू बनविणे मुलांना अनुलेखन करण्यास सांगणे निबंध लिहिणे, वाचनमध्ये वर्तमानपत्र वाचन, गोष्टींची पुस्तक, शाळेतील पाठ्यपुस्तके वाचन,. मुलांचे निबंध स्पर्धा शुद्धलेखन स्पर्धा, चित्रकला स्पर्धा घेतल्या मुले त्यामध्ये आवडी सहभागी करून घेणे, वेगवेगळ्या प्रार्थना घेणे वर्गाची स्वच्छता ठेवणे,

क्षमतेनुसार शिकविताना चित्र दाखविणे अक्षर शिकविताना लिखाणाचा सराव घेण, गाणी गाण्यामध्ये वेगवेगळी गाणी मुलांना शिकविणे, त्यामुळे गाणे पाठांतर होतात. वर्गात येण्याची आवड निर्माण होते., गोष्टी शिकवणे गोष्टीवरून प्रश्न विचारणे गोष्टीचे तात्पर्य सांगणे. मुलांना निबंध लिहायला आवडते एखादे दिवशी वेगळे उपक्रम असावे असे मुलांना आवडते. आठवडयातून एकदा चित्रकला करणे, आता नविन वर्षासाठी आम्हाला ग्रिटींग तयार करायला शिकविणे.

या बालमंच प्रकल्पाच्या माध्यमातून मुलांमध्ये सकारात्मक बदल दिसून आले,

- मुलांना शाळेत येणाऱ्या अडचणी दूर होण्यास मदत झाली व मुलांचा पाया मजबूत होण्यास बालमंच उपयुक्त ठरला.त्यांच्या मनातील भीती नाहीशी झाली.
- पूर्वी कोणत्याही उपक्रमात सहभागी न होणारे विद्यार्थी लक्षणीय रित्या सक्रिय झाले.
- मुलांचे शिक्षणाची आवड, त्यांची नैतिक मूल्ये यांतील बदल बघून पालकांमध्ये बालमचांविषयी सकारात्मक भावना निर्माण झाल्या.



# संशोधनात्मक कार्य

१. आंबेगाव तालुक्यातील निराधार व्यक्ती सर्वेक्षण
२. पेसा कायदा अंमलबजावणी अभ्यास
३. बोरघर गावातील ४ वस्त्यांचे PRA सर्वेक्षण
४. शिरूर तालुक्यातील आदिवासी भिल्ल व पारधी समाजाचे सर्वेक्षण
५. वन हक्क विषयी विशेष व्याख्यान

# १. आंबेगाव तालुक्यातील निराधार व्यक्ती सर्वेक्षण

आंबेगाव तालुक्यातील निराधार , विशेष व्यक्तींचे सर्वेक्षण करून त्यांचे मूलभूत प्रश्न समोर आणण्यासाठी आदिम संस्कृती अभ्यास , संशोधन व मानव विकास केंद्र या संस्थेच्या माध्यमातून पुणे जिल्ह्यातील आदिवासी , ग्रामीण भागात विविध संशोधनपरव रचनात्मक काम सुरू आहे . आदिवासी , दलित , महिला , श्रमिक , तसेच विविध कष्टकरी समुदायाच्या प्रश्नांविषयी संस्थेच्यामाध्यमातून पद्धतीने अभ्यास केला जातो . या अभ्यासातून जे निष्कर्ष समोर येतात आणि जी वास्तवता समोर येते ती समाजासमोर व प्रशासनासमोर मांडण्याचे काम संस्था करत आहे. बी.डी. काळे महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या मदतीने संस्थेने आंबेगाव तालुक्यातील निराधार, अपंग, परितक्त्या, विधवा यांच्या आर्थिक व सामाजिक समस्या समजून घेण्यासाठी संस्थेने तालुक्यातील व्यक्तींचे सर्वेक्षण केले.

# २. पेसा कायदा अंमलबजावणी अभ्यास

पंचायत विस्तार (अनुसूचित क्षेत्र) कायदा, १९९६ (पेसा) अंमलबजावणी विषयक अभ्यासाचा अहवाल अनेक वर्षांच्या संघर्षानंतर पेसा कायद्याच्या रूपाने या देशातल्या आणि राज्यातल्या आदिवासींना त्यांचे हक्क परत मिळाले. पण एका बाजूला आजवर नाकारले गेलेले अधिकार परत मिळून खाजगी मालकीची संकल्पना रुजणे आणि दुसरीकडे बाजारातील आमिषे व दबावाने त्या खाजगी मालकीखालील साधनसंपत्तीवरील स्वामित्व गमवावे लागणे, अशा कोंडीत आजघडीला आदिवासी समाज सापडला आहे. खऱ्याखुऱ्या लोकशाही निर्णयप्रक्रिया आणि यंत्रणांच्या अभावी बाजारयंत्रणा किंवा हिंसात्मक प्रतिकाराच्या मार्गाला शरण जाणे हाच पर्याय आदिवासी समूहांपुढे उरला आहे. आदिवासी स्वशासनाचा विचार केल्याखारीज आदिवासी विकासाचा विचार पूर्ण होऊ शकत नाही.

आदिवासी पट्ट्यातील हिंसाचार थांबवणे ही त्या पट्ट्यातील मागासलेपणा दूर करण्यासाठीची पूर्वअट आहे आणि आदिवासींचे मागासलेपण दूर करून त्यांना समुचित विकासाची संधी देण्यासाठी आदिवासी स्वशासनाचा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. पेसा कायद्याची खऱ्या अर्थाने अंमलबजावणी हे त्या दिशेने टाकायचे महत्त्वाचे पाऊल आहे.वनहक्क कायदा व आदिवासी उपयोजना यासारख्या आदिवासी समूहांच्या दृष्टीने कळीच्या धोरणांची योग्य अंमलबजावणी होण्यासाठी पेसा कायद्याच्या अनुषंगाने केलेल्या बदलांची काटेकोर अंमलबजावणी होणेही महत्त्वाचे आहे. हे सारे घडवायचे असेल, तर या कायद्याबाबत, या कायद्याच्या इतिहासाबाबत आणि या कायद्याच्या अंमलबजावणीच्या कामगिरीबाबत वास्तव समोर आणणे, आणि पेसा कायद्याच्या प्रामाणिक अंमलबजावणीसाठी जनमत संघटित करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने राष्ट्रीय जनवकालत अध्ययन केंद्र आणि आदिम संस्कृती अभ्यास, संशोधन व मानवी विकास केंद्र, आंबेगाव यानी केलेला हा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. पुणे जिल्ह्यातील आंबेगाव व जुन्नर तालुक्यातील ४३ ग्राम पंचायतींमधील ८३ गावांमध्ये प्रत्यक्ष सर्वेक्षण करून, लोकांशी चर्चा करून हा अभ्यास करण्यात आला आहे. अकादमिक संशोधनाची शिस्त पाळून केलेल्या या अभ्यासातून हाती आलेल्या निष्कर्षांवर न थांबता पेसा कायद्याच्या अंलबजावणीसाठी काय केले पाहिजे, याबाबत ठोस सूचनाही हा अहवाल करतो.

**अभ्यासात समाविष्ट विद्यार्थी व संस्था** :

समीर गारे, प्रा. स्नेहल साबळे, आशा लोहकरे, निवृत्ती भवारी, विशाल पेटारे, महेश गाडेकर, राजू शेळके, अक्षय घोडे, नवनाथ मोरे, विलास साबळे, रामदास जोशी, अनिल सुपे, अमोल गावडे.
आशी बाजपाई, विष्णु नायर, सौम्यद्युति देयचौधुरी-टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्स- तुळजापूर
स्नेहप्रभा थोरवे- कर्वे इन्स्टिट्युट ऑफ सोशल सर्व्हिस, पुणे.

**अभ्यासाचे स्वरूप व व्याप्ती**

पेसा कायद्याचे महत्व आणि औचित्य लक्षात घेऊन नॅशनल सेंटर फॉर ॲडव्होकसी स्टडीज (NCAS) आणि आदिम संस्था यांनी संयुक्तरित्या सदर सर्वेक्षण पार पाडले. सदर अभ्यास पुणे

जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील पेसा कायदा लागू असलेल्या ८३ गावांमध्ये आणि ४३ ग्रामपंचायतींमध्ये पार पडला. साधारणपणे प्रत्येक गावातील सहा व्यक्ती, सरपंच/ग्रामसेवक यांच्या समवेत बैठका पार पडल्या.

या ८३ गावांमधील एकूण ४३६ प्रतिसादकर्त्यांचा समावेश या सर्वेक्षणात आहे. या प्रतिसादकर्त्यांमध्ये ३१३ पुरुषांचा आणि १२३ स्त्रियांचा समावेश होता. या अभ्यासात प्रतिसादकर्त्यांना पेसा कायद्याविषयीची जागरुकता, गावातील सुशासन आणि त्या संदर्भातील तरतुदी तसेच पेसाची अंमलबजावणी याबाबतचे प्रश्न विचारले गेले.

अभ्यास पद्धती

प्रत्यक्ष क्षेत्रभेट, वैयक्तिक मुलाखत, सामूहिक बैठका, निरीक्षण, सर्वेक्षण या अभ्यास पद्धतींचा अवलंब केला गेला.

अभ्यास क्षेत्र

आंबेगाव तालुक्याचा पूर्व भाग काहीसा पठारी स्वरूपाचा आहे आणि त्यामुळे पूर्व भागाहून, पश्चिम आदिवासी भागातील. आदिवासींच्या समस्या वेगळ्या आहेत. एकूणात पूर्व आणि पश्चिम आंबेगावमधील समस्यांमध्ये काही मुलभूत फरक आहे. पूर्व भागात आदिवासींचे प्रमाण तुलनेने कमी आहे. सदर अभ्यासाकरता पूर्व भागातील १७ तर पश्चिम भागातील ४६ अशा एकूण ६३ गावांचा समावेश होता. यासोबत जुन्नर तालुक्यातील २० गावांचा देखील यामध्ये समावेश होता. ही गावे जुन्नर तालुक्यातील वेगवेगळ्या भौगोलिक प्रदेशातील घेण्यात आलेली आहेत. काही गावे ही पुर्णतः डोंगराळ भागातील तर काही गावे धरण क्षेत्राजवळील आहेत. त्यामुळे धरण क्षेत्राजवळ असणाऱ्या या गावांत काही प्रमाणात बागायती शेती पिकते. तेथील लोकसंख्या ही काही प्रमाणात आदिवासी तर काही प्रमाणात बिगर आदिवासी अशी आहे.

**आंबेगाव पूर्व** :

१) आंबेदरा २) ढाकाळे ३) साल ४) गंगापूर खुर्द ५) गंगापूर बुद्रुक ६) शिनोली ७) डिंभे खुर्द ८) डिंभे बुद्रुक ९) कानसे १०) चपटेवाडी ११) आमोंडी १२) पिंपळगाव तर्फे घोडा १३) पोखरकरवाडी १४) उगलेवाडी-फदालेवाडी १५) सुपेधर १६) आपटी १७) फलकेवाडी.

**आंबेगाव पश्चिम** :

१) आहुपे २) पिंपरगणे ३) आघाणे ४) डोण ५) नाव्हेड ६) नानवडे ७) तिरपाड ८) कोलतावडे ९) कळंबई १०) बोरघर ११) वरसावने १२) पंचाळे बुद्रुक १३) वचपे १४) पंचाळे खुर्द १५) आडिवरे १६) असाणे १७) मेनुंबरवाडी १८) फलोदे १९) सावरली २०) कुशिरे बुद्रुक २१) मेघोली २२) कुशिरे खुर्द २३) कोंढरे २४) दिगद २५) पाटण २६) साकेरी २७) पिंपरी २८) म्हाळुंगे तर्फे आंबेगाव २९) माळीण ३०) आमडे ३१) आंबेगाव ३२) फुलवडे ३३) जांभोरी ३४) नांदुरकीचीवाडी ३५) कोंढवळ ३६) निगडाळे ३७) तेरुंगण ३८) राजपूर ३९) गाडेवाडी ४०) तळेघर ४१) चिखली ४२) पोखरी ४३) राजेवाडी ४४) मापोली ४५) गोहे खुर्द ४६) गोहे बुद्रुक.

**जुन्नर तालुका** :

१) कोटमवाडी २) ठाकरवाडी (बारवचीवाडी) ३) मढ (बगाडवाडी) ४) तळेरान ५) खैरे - खटकाळे (खैरे) ६) देवळे (चिंचेचीवाडी) ७) तळमाचीवाडी ८) घाटघर ९) डावखरवाडी १०) नागेश्वरवाडी ११) भोलेवाडी १२) कोल्हेवाडी १३) निमगिरी १४) खटकाळे खैरे १५) माणकेश्वर १६) भिवाडे खुर्द १७) भिवाडे बुद्रुक १८) आंबे १९) हातविज २०) इंगळुन

या एकूण ८३ गावांचा समावेश अभ्यास क्षेत्रात होता.

**पेसा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी खालील सूचना** -

पेसाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सदर अहवाल प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि गैरसरकारी संस्था अशा तीन पातळ्यांवर सूचना करत आहे.

**प्रशासन पातळीवरील**-

प्रशासनाकडे वेगवेगळी माध्यमं आणि त्यांचा योग्य वापर करण्यासाठी प्रभावी यंत्रणा असते. या यंत्रणेचा वापर प्रशासनाने प्रभावीपणे केल्यास अनेक बाबी साध्य होऊ शकतात. यामध्ये -

१. जागरुकता निर्माण करण्यासाठी शाळा, महाविद्यालये या संस्थांचा सुयोग्य वापर करायला हवा. शाळेमध्ये या संदर्भाने विद्यार्थ्यांना माहिती देण्यात यावी. शाळेमध्ये पालकांसोबत बैठका घेण्यात येतील तेव्हा शिक्षकांनी याबाबत जाणीव जागृती निर्माण करावी.

२. तंत्रज्ञानाचा वापर हळूहळू ही गावेही तंत्रज्ञानाच्या दिशेने वाटचाल करत असल्याने समाजमाध्यमांचा वापर करुन गावकऱ्यांना याविषयी माहिती देण्यात यावी.

३. पेसा संघटकांची भूमिका निर्णायक आहे. प्रत्येक गावातील काही सुजाण नागरिकांना सोबत घेऊन पूर्ण गावात पेसाविषयक जागृती निर्माण करावी.

४. त्रैमासिक आढावा आणि सूसूत्रताः पेसा संघटक, ग्रामसेवक, सरपंच आणि ग्रामको समितीतील सदस्यांच्या कामाचा आढावा दर तीन महिन्यांनी घेण्यात यावा. यातून त्यांनी केलेल्या कामाचा अंदाज येईल. त्यांचे उत्तरदायित्व निर्धारित होईल. तसेच त्यांना येत असणाऱ्या अडचणी वरिष्ठ स्तरावर पोहोचवता येतील व त्यातून अधिक प्रमाणात सूसूत्रता येईल.

५. प्रशिक्षण कार्यक्रम हे प्रत्येक गावासाठी वर्षातून चार वेळा पार पडायला हवेत. तसेच पेसा संघटक, ग्रामसेवक व सरपंच यांच्याकरिता वेगळ्या प्रशिक्षणाची व्यवस्था करणे जरुरीचे आहे.

६. इतर कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीच्या चौकटीत पेसाचा विचार करुन अधिकाधिक लाभार्थ्यांपर्यंत योजना पोहोचतील अशी सक्षम यंत्रणा निर्माण करण्याच्या । दृष्टीने शासनाने पावलं टाकावीत.

७. यासोबतच जास्तीत जास्त ग्रामसभा आयोजित करण्यावर भर देणे व ग्रामसभेला जास्तीत जास्त उपस्थिती कशी वाढेल यासाठी विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे.

८. पेसाच्या अंमलबजावणी दरम्यान काही धोरणात्मक प्रश्न निर्माण झालेले दिसून येतात उदा. पेसा गावातील बिगर आदिवासी यांचेबाबत धोरण, कमी आदिवासी लोकसंख्या असलेले गावे पेसा क्षेत्रात

समाविष्ट झाल्याने निर्माण झालेले प्रश्न. यासाठी एकूणच पेसाच्या अंमलबजावणीत निर्माण होत असलेल्या अडचणी व काही धोरणात्मक बाबी याचा एकत्रित आढावा घेनेसाठी या क्षेत्रातील जाणकार व्यक्ती यांना सोबत घेवून एक समिती प्रस्थापित करून तिने आपला सविस्तर अहवाल शासनास सादर करावा व त्यानुसार काही निर्णय व्हावे.

**लोकप्रतिनिधी पातळीवर-**

लोकप्रतिनिधी ही गावातील निर्णायक व्यक्ती असते. आपल्या गावाचा विकास करण्याचे काम मुख्यतः या लोकप्रतिनिधींकडून होणे अपेक्षित आहे. लोकप्रतिनिधी गावातील नागरिकांच्या समस्यांविषयी व तेथील रहिवासी असल्याने त्यांना गावातील सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक परिस्थिती या बाबतीतील नीट माहिती असते. त्यामुळे या लोकप्रतिनिधींनी खालील बाबी करणे आवश्यक आहे.

१) कायद्यात तरतूद केल्याप्रमाणे जास्तीत जास्त ग्रामसभा आयोजित करणे व या ग्रामसभांना जास्तीत जास्त उपस्थिती कशी राहील, यासाठी विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे. नागरिकांची उपस्थिती वाढविण्यासाठी गावातील लोकप्रतिनिधींनी ग्रामसभेत झालेल्या निर्णयांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

२) सर्वच नागरिक ग्रामसभेला येतीलच असे नाही. परंतु, गावात असणाऱ्या महिला बचत गट, शेतकरी गट यांच्या मासिक बैठका होत असतात. यावेळेस त्यांना समजेल अशा सोप्या भाषेत कायदा व त्यातील तरतुदी समजून सांगणे आवश्यक आहे.

३) महिलांची उपस्थिती वाढविण्यासाठी महिलांच्या विशेष ग्रामसभा घेणे आवश्यक आहे. यासाठी लोकप्रतिनिधींनी प्रयत्न करणे गरजचे आहे.

४) पेसा संघटक हा शिक्षित व कायद्याची कमाल माहिती असलेला असेल अशाच व्यक्तीची निवड करण्यात यावी व त्यास वेळोवेळी घेण्यात येणारे किमान प्रशिक्षण कार्यक्रम हे बंधनकारक असावेत.

**गैरसरकारी संस्था (NGOs) पातळीवर -**

गावात वेगवेगळ्या सामाजिक काम करणाऱ्या गैरसरकारी संस्था कार्यरत आहेत. या संस्था देखील त्यांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या समूहास कायद्याविषयी माहिती देऊन प्रशिक्षित करणे गरजेचे आहे.



# ३. बोरघर गावातील ४ वस्त्यांचे PRA सर्वेक्षण

**बोरघर मधील चार वसत्यांचे सहभागी ग्रामीण मूल्यांकन** :

बोरघर ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या घोडेवाडी, माळवाडी, काळवाडी आणि उंबरवाडी ह्या चार वाड्यांमधील १५० कुटुंबांचे सर्वेक्षण ग्रामीण सहभागी मुल्यांकन (Participatory Rural Appraisal - PRA) करण्यात आला होता. या सर्वेक्षणाचे काम टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स (TISS) येथील पुढील ७ विद्यार्थ्यांनी इंटरशीपच्या दरम्यान केलेले आहे.

१. नूतन क्षिरसागर
२. दिव्या जाधव
३. ज़ेबा शाहिद
४. सत्यपाल कांबळे
५. शिवम शांडिल्य
६. नितीन माने
७. ऋषिकेश नागदवने

हे सर्वेक्षणाचे कार्य एप्रिल २०२२ ते मे २०२२ च्या दरम्यान पार पडले . वरील ४ वस्त्यांचे PRA सर्वेक्षण करीत असताना त्या वस्त्यांमधील मूलभूत सेवा-सुविधा विषयी प्रश्न दिसून आले.यामध्ये पिण्याचे पाणी, रस्ता, शौचालयाचे प्रश्न, विजेचे प्रश्न, शिक्षण आणि शेतीचे प्रश्न असे काही प्रश्न आलेले दिसून आले. या सर्व प्रश्नांचे स्वरूप समजून घेवून सर्वेक्षण करणाऱ्या टीम ने खालील शिफारसी केलेल्या आहेत

**प्रमुख शिफारशी**:

१. चारही वाड्यांसाठी दिवसातून किमान दोनवेळा एक सकाळी आणि एक सायंकाळी तरी मिनीबसची / वाहनाची सुविधा झाली पाहिजे.
२. पावसाचे पाणी साठवण्याची उत्तम सोय आणि सरकारी पाण्याच्या टँकरच्या नियमित यंत्रणा कार्यरत असावी.
३. पाणी पिण्यायोग्य आहे कि नाही / पाण्याच्या गुणवत्तेसंदर्भात नियमित परीक्षण व्हावे
४. मनरेगामार्फत भौगोलिक परिस्थितिला अनुसरून योग्य साठवणुकीच्या सुविधा तयार करणे
५. गावातील लोकांना गाव पाणीपुरवठा व स्वछता समितीविषयी जागरुकता निर्माण करावी.
६. ओल्या कचऱ्याचे वैज्ञानिक पद्धतीने व्यवस्थापनासंदर्भात जनजागृती व सुका कचरयाची व्यवस्था करणे.
७. महिलांसाठी, वृद्धांसाठी वर्षातून किमान एकदा वाडीस्तरावर हेल्थ कॅम्प आयोजित करावे.
८. महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजनेची जनजागृती करणे गरजेची आहे.
९. वीजव्यवस्थेमध्ये सुधारणा होणे गरजेचे आहे बोरघर ते चारही वाडयांना रस्ता डोंगरी असल्यामुळे रात्री वाहन चालवण्यास त्रास होऊ शकते तर रस्त्यांचा कडेने पथदिवे असायला हवेत.

१०. मीटर रीडिंग अंदाजे न देता प्रत्येक महिन्यात योग्य मीटर रीडिंग करून बिल द्यावे.
११. गावातील जुने झालेले खांब / पोल बदलण्यायात यावे.
१२. डीजीटल शिक्षणासाठी tablet चा उपयोग करता येवू शकतो. Reference - BMCWS, Khed.
१३. मुला-मुलीसाठी स्वतंत्र स्वछतागृहे असायला हवेत.
१४. अंगणवाडी आणि शाळेसाठी वेगवेळ्या इमारती झाल्या पाहिजेत.
१५. शाळेमध्ये महिला शिक्षक नाहीत तर महिला शिक्षकांचा असायला हवेत.
१६. शाळा व्यवस्थापन समितीबद्दल लोकांमध्ये जागरूकता करणे गरजेचे आहे.
१७. शाळा आणि अंगणवाडी मध्ये वीज आणि पाण्याची व्यवस्था असायला हवी.
१८. डिजिटल क्लासरूम सुविधेचा प्रभावी वापर करण्यासाठी शिक्षकांची कौशल्ये क्षमता वाढवणे.
१९. शेतीचे खातेवाटप व्हावे
२०. PM किसान योजनेचा फायदा सर्वांना मिळाला पाहिजे
२१. धुऱ्याची पुनर्बांधणी गरजेची आहे.
२२. जंगली प्राण्यांना अटकाव करण्यासाठी व प्रदेशातील अन्नसुरक्षा टिकवण्यासाठी पारंपारिक पिकांची शेती ही पडीक जमिनीवर सामुहिक शेतीद्वारे करून निवारण करण्याचा प्रयत्न होऊ शकतो.
२३. खाचर तयार करण्यासाठी बनवलेली दगडी भिंत / बांध अतिपावसामुळे वाहून गेल्यास तो लवकरात लवकर मनरेगाच्या माध्यमातून बनवला जावा
२४. पशुपालन व्यावसायिक स्तरावर होण्यासाठी शेतकरयाना ट्रेनिंग दिले जावे.
२५. पशुधनासाठी उन्हाळया मध्ये पाण्याचा हौद आणि चाऱ्याची व्यवस्था हवी.
२६. इतर गौणउपजांवर बचत गटांच्या माध्यमातून प्रक्रिया उद्योग उभारणीसाठी प्रयत्न
२७. हिरडा प्रक्रिया लघुउद्योग उभारणी
२८. वनउत्पादन आधारित शेतकरी उत्पादन कंपनी (FPO) चा विचार होऊ शकतो जेणेकरून हिरडा उत्पादक शेतकऱ्यांची bargaining capacity वाढेल.
२९. मनरेगाचा उपयोग करून व सामाजिक वनीकरण विभागामार्फत सामाजिक वनीकरण व त्यातून नैसर्गिक साधनसंपती वाढवण्यावर भर द्यावा.
३०. जंगलातील आग नियंत्रित करण्यासाठी उपाययोजना आखणे - उदा. जनजागृती, घायपातची लागवड, इ.
३१. लोकांमध्ये मनरेगाबद्दल प्रचार प्रसार ची गरज आहे.
३२. मनरेगाच्या अंमलबजावणीवर जोर देण्याची गरज आहे.
३३. मनरेगा अंतर्गत कोण-कोणती कामे पूर्ण करता येतात याबद्दल माहिती लोकांना द्यावी.
३४. नैसर्गिक साधन संपतींचा वापर करून लहान व्यवसाय करण्यासाठी प्रोत्साहनपर कार्यक्रम राबवले पाहिजेत आणि त्यांना मार्गदर्शन केले पाहिजे.
३५. तसेच बँकेतून मिळणाऱ्या सुविधांबद्दल जागरूकता करणे गरजेचे आहे जेणेकरून फक्त पैसे जमा करणे आणि बँकेतून काढणे या पलीकडचा व्यवहार झाला पाहिजे.

३६. सरकारी योजनांची जागृकता निर्माण करण्याची गरज आहे. उदा. उमेद

३७. कृषी विज्ञान केंद्रामार्फत - (नारायणगाव) गृहद्योगासाठी प्रशिक्षणाचा उपयोग करून घेणे

३८. इतर वाडीमध्येदेखील बचत गटाचे विस्तारीकरण करणे

३९. धान्याची गुणवत्ता चांगली हवी .

४०. गावापातळीवरील दक्षता समितीबद्दल लोकांना जागरूक करणे.

या अहवालाच्या आधारे ग्रामसभेमध्ये चर्चा होवून गावातील सामाजिक संस्था, संघटनेचे प्रतिनिधी या अहवालाची अंमबजावणी साठी ग्रामसभेमध्ये आग्रह धरत आहे.



# ४. शिरूर तालुक्यातील आदिवासी भिल्ल व पारधी समाजाचे सर्वेक्षण

संस्थेचे काम मुख्यतः आंबेगाव व जुन्नर तालुक्यात चालते.परंतु अलीकडील काळात संस्थेने शिरूर व मावळ तालुक्यात देखील काही विधायक उपक्रम सुरू केलेले आहेत. शिरूर तालुक्यामध्ये आदिवासी भिल्ल व पारधी समाजाची वस्ती मोठ्या प्रमाणात आहे. या समुदायाचे प्रश्न भीषण स्वरूपाचे आहे. या आदिवासी भिल्ल व पारधी समाजाच्या मूलभूत अडचणी लक्षात घेण्यासाठी या समुदायाच्या सुमारे ११० कुटुंबाचे सर्वेक्षण नोव्हेंबर २०२२ ते डिसेंबर २०२२ या दरम्यान करण्यात आले. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स (TISS) तुळजापूर येथील विद्यार्थी हे इंटरशिपसाठी संस्थेकडे आले होते. अजय पट्टेबहादू, बप्पादित्या मेहता, नेपुनी अडाखो, निकिता यादव, रेश्मी नास्कर, स्नेहलता पैकराव या विद्यार्थ्यांच्या सहभागातून हे सर्वेक्षण करण्यात आले.

या सर्वेक्षणातून दिसून आलेल्या मुख्य बाबी,

- आदिवासी भिल्ल व पारधी समाजातील २०० पेक्षा अधिक नागरिकांना, आधारकार्ड, मतदान कार्ड , रेशनकार्ड नव्हते.
- आदिवासी पारधी समाजाच्या वस्त्यांना पिण्यायोग्य पाणी, आरोग्य यासारख्या मूलभूत सुविधा देखील उपलब्ध नाहीत.
- वनहक्क कायद्याच्या अंमलबजावणीसाठी, कायदेशीर मार्गाने लढत आहे. परंतु वन विभागाच्या वतीने त्यांना दिले जाणारे विविध प्रकारचे त्रास यावेळी स्पष्टपणे दिसून आले.
- आदिवासी भिल्ल व पारधी समाजात शिक्षणाचे प्रमाण अत्यंत कमी दिसून आले.
- आदिवासी भिल्ल समाजाची प्रमुख उपजीविका ही मासेमारी व्यवसायावर अवलंबून आहे.
- पारधी समाजाला आजही पोलिस प्रशासनाच्या जाचाला सामोरे जावे लागते.

यासारखी गंभीर स्थिती यावेळी दिसून आली. हे प्रश्न सोडवण्यासाठी संस्थेच्या वतीने विभागीय आयुक्त,पुणे विभाग यांची भेट घेवून या अहवाला आधारे, प्रश्न सोडवण्यासाठी सहकार्य करण्याची विनंती करण्यात आली आहे.





# ५. वन हक्क विषयी विशेष व्याख्यान

आदिवासी वनहक्क कायद्याच्या अंमलबजावणी दरम्यान येणाऱ्या अडचणीवर सविस्तर चर्चा करण्यासाठी घोडेगाव येथे एक विशेष व्याख्यान दि.१९ जानेवारी २०२३ रोजी पार पाडले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून आयसर चे सहयोगी प्राध्यापक डॉ . शरदचंद्र लेले उपस्थित होते .
डॉ . लेले यांनी वनहक्क कायद्याविषयी संपूर्ण भारतभर संशोधन केले आहे आणि त्याबाबतचे त्यांचे अनेक अहवाल प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या अनुभवाचा फायदा पुणे जिल्ह्यात वनहक्काविषयी काम करत असलेल्या कार्यकर्ते मंडळींना व्हावा यासाठी डॉ . लेले यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते . यावेळी त्यांनी बोलताना वनहक्क कायद्याची पार्श्वभूमी , वनहक्क कायद्याचे स्वरूप आणि या कायद्याची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणी यावर सविस्तर मार्गदर्शन त्यांनी केले .

यावेळी खेड,आंबेगाव , जुन्नर तालुक्यातील प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते . याप्रसंगी सोपेकॉम संस्थेचे के.जॉय , किरण लोहकरे , राधिका कानडे , आदिम संस्थेचे डॉ . अमोल वाघमारे , राजू घोडे , ॲड . मंगल तळपे , किसान सभा पुणे जिल्हा समितीचे सचिव विश्वनाथ निगळे , सहसचिव लक्ष्मण जोशी , अमोद गरुड , एसएफआय संघटनेचे जिल्हा अध्यक्ष अविनाश गवारी , सामाजिक कार्यकर्ते बुधाजी डामसे इत्यादी उपस्थित होते.



# आरोग्य विषयक कार्य

**१. अनेमिया शिबीर**

**२. निसर्गोपचार पद्धतीची आरोग्य शिबिरे**

**३. नेत्र तपासणी शिबीर**

# १. अनेमिया शिबीर

आदिवासी व ग्रामीण भागातील महिलांमध्ये अनेमिया चे प्रमाण मोठ्या प्रमाणावर दिसून येते. अनेमिया म्हणजेच रक्तातील लोहाचे प्रमाण कमी असणे होय. या अनेमिया विषयी महिलांना शास्त्रशुद्ध माहिती व्हावी, रक्तातील लोहाचे प्रमाण कमी झाल्यास उद्भवणारे आजार या विषयी सविस्तर माहिती देणारा दि. ५ मे २०२२ रोजी तेरुंगण, ता.आंबेगाव जि.पुणे  या आदिवासी समुदायाची वस्ती असलेल्या गावात आयोजित करण्यात आला होता. यावेळी उपस्थित ४० आदिवासी महिलांना जेष्ठ स्त्रीरोग तज्ञ डॉ.मोहन साळी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थित महिलांनी त्यांचे विविध आरोग्य विषयक प्रश्न उपस्थित करून त्यावर चर्चेतून उत्तरे मिळवली.



## २.महिलांची आरोग्य तपासणी व एनिमिया विषयक मार्गदर्शन शिबीर -

ग्रामीण,आदिवासी भागातील महिलांमध्ये,एनिमिया हा आजार प्रामुख्याने दिसून येतो.अनिमिया निर्मूलनसाठी महिलांचे प्रबोधन,योग्य औषधपचार व नियमित तपासणी आणि परसबागेतील सेंद्रिय व विषमुक्त भाज्यांचा आहारात वापर, या तीन सूत्रांच्या आधारे,आंबेगाव तालुक्यातील आदिवासी भागात अनिमिया निर्मूलनसाठी,काम करण्याचे आदिम संस्था,व शहीद राजगुरू ग्रंथालय, यांनी एकत्रित ठरवले आहे.यासाठी तालुका आरोग्य विभाग, डॉ. शेखर बेंद्रे आरोग्य केंद्र, व विविध सामाजिक संस्था,व्यक्ती मदत करणार आहेत.

दिनांक- १४-२-२०२३ रोजी,शहीद राजगुरू ग्रंथालय व सार्वजनिक वाचनालय,फलोदे याठिकाणी,फलोदे गावातील,महिलांची HB तपासणी विषयक शिबीर व अनिमिया विषयक मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.आरोग्य विभाग, पंचायत समिती, आंबेगाव, यांच्यावतीने डॉ.लिना शिंदे उपस्थित होत्या.तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र,तळेघर येथील आरोग्य सेवक,श्री. संजय बांगर,श्री. अप्पा कोळी,लबटेक्नेशियन,श्री.राक्षे,श्रीमती उंडे सिस्टर इ.कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

यावेळी डॉ.लिना शिंदे यांनी,उपस्थित महिलांना अनिमिया विषयक माहिती देत असताना,या आजाराची कारणे व उपाय याविषयी सविस्तर माहिती दिली.रक्तातील हिमोग्लोबीन वाढविण्यासाठी हिरव्या पालेभाज्या,फळे, आहारात घेणे आवश्यक आहे. यासाठी,महिलांनी घरातील सांडपाण्यावर, परसबाग तयार केल्या पाहिजेत इ.माहिती त्यांनी उपस्थित महिलांना यावेळी दिली. यावेळी HB तपासणी करून,ज्यांचे एच. बी. कमी होते, अशा महिलांना,मोफत गोळ्या,औषधे देण्यात आले.



# २. निसर्ग उपचार तपासणी शिबिरे

### १.निसर्गउपचार तपासणी शिबिर –

बुधवार, दि. १४ डिसेंबर, २०२२ रोजी निसर्गोपचार केंद्र गोहे बुद्रुक येथील डॉक्टर यांनी, डॉ. शेखर बेंद्रे आरोग्य केंद्र, महाळुंगे पाटण या ठिकाणी येऊन या आरोग्य शिबिराला सुरुवात झाली. यावेळी स्थानिक लोकांचा सहभाग मोठ्या प्रमाणात दिसून आला.

या शिबिरासाठी २० रुग्णांनी नाव नोंदवून तपासणी केली. तर इतर लोकांनी योगा,पॅरेलिसेस , सांधेदुखी, गुडघेदुखी,कंबरदुखी यावर मार्गदर्शन घेतले. यावेळी पॅरेलिसेस , सांधेदुखी, गुडघेदुखी,कंबरदुखी व इतर आजारावर तपासणी करून उपचार करण्यात आले.

### २.निसर्गउपचार तपासणी शिबिर -

बुधवार दि.२१डिसेंबर.२०२२ रोजी दुपारी ११ ते २ वा. यादरम्यान दुसरे आरोग्य शिबिर उत्साहात पार पडले.या शिबिरासाठी ३० रुग्णांनी नाव नोंदवून तपासणी केली. उपस्थित लोकांना सर्पदंशावर मार्गदर्शन केले गेले.

### ३.निसर्गउपचार तपासणी शिबिर -

बुधवार दि.२८डिसेंबर,२०२२ रोजी दुपारी एक ते चार यादरम्यान हे आरोग्य शिबिर पार पडले.या शिबिरासाठी ११ रुग्णांनी नाव नोंदवून तपासणी केली. लोकांना सहजरीत्या करता येईल असे व्यायाम यावेळी शिकवण्यात आले.

### ४.निसर्गउपचार तपासणी शिबिर -

बुधवार, दि.०४ जानेवारी,२०२३ रोजी दुपारी एक ते चार यादरम्यान आरोग्य शिबिर उत्साहात पार पडले.या शिबिरासाठी ४० रुग्णांनी नाव नोंदवून तपासणी केली.

## ५.निसर्गउपचार तपासणी शिबिर -

बुधवार दि. ११ जानेवारी, २०२३ रोजी दुपारी १ वा.ते ४ वा. यादरम्यान आरोग्य शिबिर उत्साहात पार पडले.या शिबिरासाठी ५० रुग्णांनी नाव नोंदवून तपासणी केली. उपस्थित लोकांना, योग्य आहार कसा घ्यावा यावर मार्गदर्शन करण्यात आले

## ६.निसर्ग उपचार शिबीर-

बुधवार दि.०८ फेब्रुवारी, २०२३ रोजी दुपारी १ वा.ते ४ वा. यादरम्यान आरोग्य शिबिर उत्साहात पार पडले. यावेळी राष्ट्रीय प्राकृतिक चिकित्सा संस्थान पुणे यांच्या वतीने विविध आजारांवर तपासणी करण्यात आली. या शिबिरासाठी २० रुग्णांनी नाव नोंदवून तपासणी केली.

## ७.निसर्गउपचार तपासणी शिबिर -

दि.१५ फेब्रु,२०२३ रोजी डॉ.शेखर बेंद्रे आरोग्य केंद्र,येथे निसर्गउपचार तपासणी शिबीर पार पडले.यावेळी २० रुग्णांची तपासणी करण्यात आली.व त्यांची मालिश ही करण्यात आली.

# ३. डोळे तपासणी व मोफत चष्मे वाटप शिबीर

## १.डोळे तपासणी व वाचनाचे चष्मे मोफत वाटप -

बुधवार, दि.२९ जानेवारी,२०२३ रोजी दुपारी १ वा.ते ४ वा. यादरम्यान नेत्र तपासणी करण्यात आली. नुकतेच, जतन फौंडेशन, आदिम संस्था, ग्लोबल व्हिजन फौंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने, डॉ. शेखर बेंद्रे आरोग्य केंद्र, म्हाळुंगे,तर्फे आंबेगाव ता.आंबेगाव, जि.पुणे येथे मोफत नेत्र तपासणी शिबीर व मोफत चष्मे वाटप शिबीर पार पडले. " या शिबिरासाठी पुण्यातील नेत्ररोगतज्ञ, डॉ.बबन डोळस, डॉ. संजय कसबे व त्यांचे सहकारी डॉक्टर हे उपस्थित राहून, त्यांनी रूग्णांची मोफत तपासणी केली. यावेळी उपस्थित रुग्णांना गरजेनुसार वाचनासाठी उपयुक्त ठरणारे, मोफत चष्मे वाटप केले.हे चष्मे जतन फौंडेशन यांनी उपलब्ध करून दिले होते.

यावेळी, ५० पेक्षा अधिक रुग्णांची तपासणी करून त्यांचेवर औषध उपचार करण्यात आले. व सुमारे ४० रूग्णांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले.यावेळी १० रूग्णांना, मोतीबिंदू असल्याचे दिसून आले.त्यांच्यावर पुढील शस्त्रक्रिया करण्यासाठी, ग्रामीण रूग्णालय, घोडेगाव येथे समनव्य करून ही ऑपरेशन होतील.



## २.डोळे तपासणी व वाचनाचे चष्मे मोफत वाटप –

रविवार दि.२९ जानेवारी,२०२३ रोजी गाडेकर वाडी खुर्द या ठिकाणी हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.यावेळी मोफत डोळे तपासणी ६५ व्यक्तींची करण्यात आले तर एकूण ४८ लोकांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले. तसेच डोळ्यांचे ऑपरेशन हे गरज असणारे काही वयस्कर व्यक्तींना डॉ. डोळस यांनी पुढील मार्गदर्शन केले.यावेळी डोळे तपासणी करून वाचनाचे चष्मे मोफत वाटप करण्यात आले.

यावेळी उपस्थित रुग्णांना मार्गदर्शन करताना डॉ. बबन डोळस यांनी उपस्थितांना डोळ्याची काळजी कशी घ्यावी, डोळ्यांसंबंधित असणारे प्रश्न समजून घेऊन त्यावर मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती डॉ. बबन डोळस व टीम, डॉ. संजय कसबे, सिताराम जोशी माजी उपकुलसचिव पुणे विद्यापीठ, अशोक पेकारी किसान सभा आंबेगाव, विठ्ठल सुपे ग्रा.पं.स.गोहे बुद्रुक, प्रा. महेश गाडेकर, अनिल सुपे, प्रथमेश तळपे इत्यादी उपस्थित होते.या कार्यक्रमासाठी जतन फाउंडेशन फॉर इन्क्लुजन, आदिम संस्था, ग्लोबल फाउंडेशन पुणे यांच्या संयुक्त सहकार्याने व किसान सभा तालुका आंबेगाव यांच्या स्थानिक संयोजनातून हा कार्यक्रम पार पडला.



# आरोग्यवर्धिनी उपकेंद्र सक्षमीकरण प्रकल्प

## प्रकल्पाचे नाव : आंबेगाव तालुक्यातील आरोग्यवर्धिनी केंद्राचे सक्षमीकरण .

**प्रास्ताविक** : आंबेगाव तालुक्यातील पच्छिम आदिवासी भागातील आरोग्यवर्धिनी केंद्रात सर्वांसाठी दर्जेदार आरोग्य सविधा मिळावी. तसेच आरोग्यवर्धिनी केंद्राच्या कार्यक्षेत्रातील लोकांना वेगवेगळ्या प्रकारच्या प्रतिबंधात्मक, प्रसारक , उपचारात्मक आरोग्य सेवा मिळाव्या. या उद्देशाने आरोग्य वर्धिनी केंद्राचे सक्षमीकरण होणे गरजेचे आहे, आणि त्या दृष्टीने अनुसंधान ट्रस्ट - साथी व आदिम संस्था यांच्या सहकार्याने हा प्रकल्प राबविण्यात आला.

या प्रकल्पाअंतर्गत पुढील आरोग्यवर्धिनी केंद्र १.आहुपे , २. तिरपाड ,३. माळीण , ४. असाणे, ५. बोरघर ६. फुलवडे, ७.कानसे , ८. डिंभे, ९. शिनोली, १०.पिंपळगाव घोड़े, ११. गंगापुर खुर्द, १२. गंगापुर बुद्रुक, १३. आमोंडी , १४. तेरुंगण, १५.जांभोरी ,१६. राजेवाडी ,१७. पोखरी, १८. कुशिरे बुद्रुक , १९ .पाटण २०.अडीवरे येथे हा प्रकल्प राबविण्यात आला.

**या प्रकल्पाच्या माध्यमातून वर्षभरात झालेले प्रमुख कार्यक्रम** :

- समन्वयक विशेष कार्यशाळा : २ मे २०२२ रोजी समन्वयाकांची कार्यशाला घेण्यात आली .या मध्ये आरोग्यवर्धिनी केंद्रातील जन आरोग्य समित्या गठीत करण्याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.यावेळी तालुका आरोग्य आधिकारी देखिल उपस्थित होते व त्यांच्याच माध्यमातून समन्वयक आरोग्यवर्धिनी केंद्रावर जावून समुदाय आरोग्य आधिकारी यांच्या भेटी घेतल्या.
- जन आरोग्य समिती गठीत : गावातील ग्रामस्थ , उपकेंद्रचे अधिकारी यांच्या उपस्थितीत ग्रामसभेमध्ये जन आरोग्य समिती गठीत करण्यात आली . व तसा ग्रामसभेत अधिकृत ठराव करण्यात आला.
- सर्वे : समन्वयक व जन आरोग्य समिती यांच्या मार्फत प्रत्येक आरोग्यवर्धिनी केंद्राची सद्यस्थिती संदर्भात सर्वेक्षण करण्यात आले व त्यातून प्रत्येक केंद्रावर आसलेल्या समस्या समोर आल्या व त्या दृष्टीने त्यामध्ये सुधारणा करण्यात आल्या .
- बैठक : प्रत्येक आरोग्यवर्धिनी केंद्रात गठी त केलेल्या जन आरोग्य समितीच्या नियमित बैठका घेण्या संदर्भात वारंवार केंद्राना भेटी देवून CHO यांच्या समन्वयातून बैठका घेण्यात आल्या व त्यातून उपकेंद्रात असलेल्या समस्यां बाबत निर्णय घेण्यात आले.
- जन आरोग्य समिती कार्यशाळा : जन आरोग्य समिती सदस्यांना त्यांच्या कार्य / आधिकार जाणीव व्हावी व या व्यवस्ठेमध्ये त्यांचा सक्रीय सहभाग वाढावा या उद्देशाने आरोग्यवर्धिनी केंद्र पातळीवर जन आरोग्य समिती कार्यशाळा दिंनाक .१८/०८/२०२२ रोजी अडीवरे व घोडेगाव या ठिकाणी दोन सत्रात या कार्यशाळा पार पडल्या.

- महादुच पत्र : लोकांमध्ये आरोग्यवर्धिनी केंद्रातील मिळानार्या सोयी सुविधा व जन आरोग्य समिती सक्रीय झाली तर काय बदल होऊ शकतो या विषयी एक पत्रक तयार करुण गावोगाव वाटन्यात आले.
- उपकेंद्र सोशल ऑडिट कार्यशाळा : नोव्हेंबर २०२२ मध्ये आरोग्यवर्धिनी केंद्र असलेल्या गावातील ग्रामस्थ , सामाजिक कार्यात सक्रीय असलेले तरुण ,सरपंच , आशा वर्कर , व केंद्रातील कर्मचारी यांच्या समावेत ही बैठक पार पडली .यासाठी साथी संस्थ्येचे भाऊसाहेब आहेर सर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.
- जन संवाद बैठक : आरोग्य विभाग पंचायत समिती आंबेगाव , आदिम संकृती अभ्यास,संशोधन व मानव विकास केंद्र घोडेगाव व साथी संस्था पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पंचायत समितीच्या हॉल मध्ये २८ डिसेंबर २०२२ रोजी हि बैठक पार पडली . या वेळी गट विकास आधिकारी , तालुका आरोग्य अधिकारी , उपकेंद्रतिल CHO व त्यांचे सहकारी , दोन्ही संस्थांचे प्रमुख पदाधिकारी व प्रत्येक गावातील ग्रामस्थ उपस्थित होते. या वेळी उपकेंद्रतिल समस्या विषयी ग्रामस्थानी सांगितले व त्यावर उपाययोजना काय करता येतील हे आरोग्य विभाग यांनी सांगितले. अतिशय सकारात्मक ही बैठक पार पडली . विशेष म्हणजे या प्रकल्पातुन झालेलेले बदल ग्रामस्थ, जन आरोग्य समिती सदस्य व समुदाय आरोग्य अधिकारी यांनी प्राशासनाच्या निदर्शनात आणून दिले.

**या प्रकल्पातून साध्य बाबी** –

- जन आरोग्य सामिती गठीत करण्यासाठी ग्रामासभेतुन जनतेचा आग्रह त्यामुळ समिती गठीत झाल्या.
- जन आरोग्य समिती बैठक होण्यास आग्रह धरल्याने त्या नियमित होऊ लागल्या.
- काही उपकेंद्रामध्ये नियमित CHO , ANM, MPW येत नव्हते ते येऊ लागले.
- उपकेंद्रात OPD वाढली.
- खाजगी दवाखान्यात जाणार्या रुग्नांचा सरकारी दवाखान्यात येण्याचा कल वाढला.
- जन आरोग्य समिती सक्रीय झाल्याने आरोग्य उपकेंद्रांची दुरुस्ती होण्यास मदत झाली.
- जनतेची व रुग्नांची उपकेंद्रात सहभाग व देखरेख वाढली.
- तालुका आरोग्य विभागाच्या समन्वयातून आरोग्य यंत्रणा मजबूत होण्यास मदत झाली.
- जनसंवादाच्या माध्यमातून आरोग्य यंत्रनेवर देखरेखीचे प्रमाण/काम वाढले.
- BP/ शुगर सारख्या अजारांच्या तपासण्या व औषधोपचार उपकेंद्रात नियमित होऊ लागले.
- जन आरोग्य समित्या सक्रीय झाल्याने मिळणारा निधीचा योग्य विनियोग होण्यास मदत झाली.

# विशेषदिनानिमित्ताचे कार्यक्रम

## १. महात्मा फुले जयंती

महात्मा फुले यांच्या जयंती दिनानिमित्त, संस्थेच्या वतीने घोडेगाव  येथे प्रतिमापूजन करून अभिवादन करण्यात आले .

यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून आंबेगाव तालुका पंचायत समितीच्या सहायक गटविकास अधिकारी अर्चना कोल्हे यांनी त्यांच्या मनोगतात महात्मा फुले यांचे कार्य , विशेषत : महिलांसाठी केलेले कार्य आणि त्याग , त्यासाठी सहन केलेला समाजाचा रोष याविषयी माहिती दिली.महात्मा जोतिबा फुले यांचे कार्य आजही दिशादर्शक आहे. यापुढील काळातही महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या विचारांची गरज आहे , असे मत त्यांनी व्यक्त केले .

कार्यक्रमाला किसानसभेचे तालुका उपाध्यक्ष राजु घोडे , शंकर काठे , अशोक जोशी , डॉ. अमोल वाघमारे उपस्थित होते .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंकिता सैद, प्रास्ताविक शंकर काठे व आभार नंदन लोंढे यांनी मानले. कार्यक्रमाचे संयोजन , दिव्या जाधव , नंदन लोंढे , दुर्गा गुप्ता , रचना अकोलकर , वैष्णवी सहाणे , अंकिता सैद , तेजल विरणक यांनी केले.



# २. आंतराष्ट्रीय परिचारिका दिन

**ग्रामीण रुग्णालयातील परिचारिका, सुषमा घोडे यांचा परिचारिका दिनानिमित्त सन्मान**

संस्थेच्या घोडेगाव येथील कार्यालयात, जागतिक परिचारिका दिन साजरा करण्यात आला . यावेळी ग्रामीण रुग्णालय,घोडेगाव येथे कार्यरत असणाऱ्या, परिचारिका सुषमा घोडे यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

ग्रामीण रुग्णालयाचे डॉ. गणेश शेंगाळे व प्रा. सागर पारधी यांच्या हस्ते परिचारिका, सुषमा घोडे यांना क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा फोटो ,पुष्पगुच्छ व पुस्तक देऊन सन्मानित करण्यात आले . सार्वजनिक किंवा खाजगी आरोग्य व्यवस्थेत परिचारिकांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे . याचबरोबर, करोना संसर्गजन्य आजाराच्या संकटकाळात परिचारिकांचे कार्य उल्लेखनीय ठरले आहे . त्यांनी या काळात दिलेली सेवा महत्त्वाची ठरली आहे , असे मत यावेळी डॉ . शेंगाळे यांनी व्यक्त केले.
यावेळी , किसान सभेचे राजू घोडे , एसएफआय संघटनेचे पुणे जिल्हा अध्यक्ष अविनाश गवारी, आदिम संस्थेचे नंदन लोंढे , अर्चना गवारी , ग्रामीण रुग्णालयाच्या ज्योती वाळुंज उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि आभार अविनाश गवारी यांनी मानले. कार्यक्रमाचे संयोजन अनिल सुपे, नंदन लोंढे, अर्चना गवारी यांनी केले.



## ३. शाहू महाराज स्मृतिदिन

**छ.शाहू महाराज यांचा स्मृतिदिन साजरा**

राज्याच्या सामाजिक वैचारिक ,जडणघडणीत छत्रपती शाहू महाराज यांचे विशेष योगदान आहे . शाहू महाराज हेच आरक्षणाचे जनक आहेत , असे गौरोद्वार घोडेगाव येथील बी. डी. महाविद्यालयाच्या प्रा.डॉ.चांगुणा कदम यांनी व्यक्त केले. छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधत घोडेगाव येथे आदीम संस्था, किसान सभा व एसएफआय यांच्यावतीने आयोजित व्याख्यानात त्या बोलत होत्या.

प्रा. प्रवीण पारधी, आदीम संस्थेचे डॉ. अमोल वाघमारे, किसान सभेचे अमोल गिरंगे, संदीप काठे, शंकर काठे, एसएफआयचे अविनाश गवारी आदी उपस्थित होते. प्रा.डॉ. कदम यांनी शाहू महाराज यांचे लोककल्याणकारी कार्य याविषयावर सविस्तर मांडणी केली. सूत्रसंचालन सत्यपाल कांबळे यांनी केले. आभार नंदन लोंढे यांनी मानले.





# ४. संविधान दिन

**संविधान दिन संस्थेच्या कार्यालयात साजरा**

घोडेगाव येथे संविधान दिनानिमित्त एसएफआय, किसान सभा व आदिम संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने, संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. तसेच,संविधानाच्या विविध मूल्यांवर मुक्त चर्चा करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एसएफआय पुणे जिल्हाध्यक्ष अविनाश गवारी , प्रमुख उपस्थिती म्हणून आदिवासी ठाकर विकास संघर्ष समितीचे अर्जुन काळे हे उपस्थित होते .

या कार्यक्रमातील संविधानाच्या मुल्यांवरील मुक्त चर्चेत उपस्थित विद्यार्थी विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन किसान सभेचे कार्याध्यक्ष बाळू काठे यांनी प्रास्ताविक आदिम संस्थेचे अनिल सुपे यांनी तर एसएफआयचे सहसचिव योगेश हिले यांनी आभार मानले.



# मदतीचे व इतर कार्य

## १. आदिवासी बांधवाना सौरदिव्यांचे वाटप

दीपावलीचे औचित्य साधत घरी वीजपुरवठ्याची सोय नसलेल्या आंबेगाव तालुक्यातील आदिवासी भागातील व ठाकरवस्ती येथील ७० कुटुंबांना सौरदिव्यांचे वाटप ईनरव्हील क्लब ऑफ निगडी प्राइड यांच्या सहकार्याने करण्यात आले . सौरदिव्यांबरोबरच वाचनसंस्कृती घरोघरी पोहोचवावी म्हणून राज्य साधन केंद्र , पुणे या संस्थेच्या वतीने उपलब्ध पुस्तकांची एक प्रतही या ७० कुटुंबांना देण्यात आली. घोडेगाव येथे आदिम संस्था आंबेगाव यांच्या स्थानिक समन्वयातून हा सौरदिवे वाटप कार्यक्रम पार पडला.

यावेळी इनरव्हील डिस्ट्रिक्टच्या चेअरमन मुक्ती पानसे , सुजाता ढमाले , डॉ. रंजना कदम, सुवर्णा जांभळकर, दीपाली जाधव , सुरेखा परिहार , ऐश्वर्या ढमाले , पोलीस उपनिरीक्षक सतीश डौले , डॉ . विलास काळे , आदिम संस्थेचे डॉ . अमोलवाघमारे , अविनाश गवारी , अर्जुन काळे , अशोक जोशी , आशा लोहकरे , दीपक रड्डे , रोहिदास गभाले , बाळू काठे , अनिल सुपे , पुंडलिक असवले आदी उपस्थित होते . यावेळी ज्या घरी वीज नसेल तेथे सौरदिवे कसे पोहोचतील , यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत , असे मुक्ती पानसे यांनी सांगितले . डॉ . अमोल वाघमारे यांनी हा सौरदिवा ज्ञानाची क्षितिजे घराघरांत पोहोचवेल , असा आशावाद व्यक्त केला . अर्जुन काळे यांनी सौरदिव्याची जोडणी व काळजी याविषयी प्रात्यक्षिक दिले.





## २. आपटी  येथे घरोघरी नळपुरवठा व पाण्याच्या टाकीचे उद्घाटन

आपटी ता . आंबेगाव येथे घरोघरी नळ पाणीपुरवठा व पिण्याच्या पाण्याच्या नवीन टाकीच्या उद्घाटनाचा कार्यक्रम अत्यंत आनंदी वातावरणातपार पडला . रोटरी क्लब निगडी पुणे यांच्या माध्यमातून ब्रिजस्टोन इंडिया कंपनीच्या आर्थिक सहकार्याने व आदिम संस्थेच्या स्थानिक संयोजनातून आपटी या गावात काही दिवसांपूर्वी २०००० लिटर ओव्हरहेड आरसीसी टाकी बांधून विहिरीतून विद्युत मोटार व पाईपलाईन द्वारे टाकीत पाणी सोडून टाकीतून गावातील घरोघरी पाणीपुरवठा करून दिला होता . या पाण्याच्या टाकीच्या उद्घाटन प्रसंगी रोटरी क्लबचे अध्यक्ष जगमोहन सिंग यांच्या हस्ते श्रीफळ फोडुन पिण्याच्या टाकीचे उद्घाटन करण्यात आले .  त्यानंतर छोटेखानी कार्यक्रम घेण्यात आला या कार्यक्रमात डॉ . अमोल वाघमारे यांनी रोटरी क्लबने इतक्या अवघड ठिकाणी येऊन , लोकांची समस्या लक्षात घेऊन पाण्याची घरपोच व्यवस्था केली त्याबद्दल कौतुक करत या भागात असेच काम करण्यासाची विनंती केली , प्रेसिडेंट जगमोहन सिंग यांनी उपस्थितांना पाणी व्यवस्थापनाबाबत संबोधित केले . या कार्यक्रमात ग्रामस्थांतर्फे उपस्थित सर्व मान्यवरांचे शाल श्रीफळ देऊन स्वागत सत्कार करण्यात आला तसेच या कामाबदाल आभाराचे पत्रही देण्यात आले .

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकेत आपटी गावातील महिलांना बापूर्वी अर्धा किमी अंतरावरील विहिरीवर पाणी आणण्यासाठी डोक्यावर हांडे घेऊन पायपीट करावी लागत होती , पावसाळ्यात तर खुप समस्यांना तोंड देत पाणी आणावे लागत होते . मात्र या घरोघरी नळ पाणीपुरवठ्यामुळे महिलांचे कष्ट बाचले असुन महिला व गावकर्यांना मोठा दिलासा मिळाला आहे . डोंगरावर असलेल्या आपटी गावासाठी ही ऐतिहासिक व स्वागतार्ह बाब आहे . यासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व संस्थांचे ग्रामस्थांतर्फे आभार असे मत  ग्राम विकास समितीचे अध्यक्ष अविनाश गवारी यांनी व्यक्त केले .

या कार्यक्रमासाथीरोटरी क्लब निगडी पुणे या संस्थेचे प्रेसिडेंट जगमोहन सिंग , पास्ट प्रेसिडेंट रानु सिंघानिया , रोटरी क्लबचे अंकाजी पाटील , राकेश सिंघानिया ब्रिजस्टोन कंपनीचे प्रतिनिधी नितीन सर , पाण्याच्या टाकीचे कंत्राटदार अशोक बिरासदार , तसेच आदिम संस्थेचे डॉ . अमोल बाघमारे , किसान सभेचे नेते राजु घोडे आदी मान्यवर उपस्थित होते.






## ३. वैद्यकीय शिक्षण पूर्ण केलेल्या स्नेहा पारधी यांचा सन्मान.

आदिवासी समुदायांमध्ये, आदिवासी ठाकर समाज हा सामाजिक,शैक्षणिकदृष्ट्या आजही अत्यंत बिकट अवस्थेमध्ये आहे. या समाजामध्ये अलीकडील काळात शिक्षणाचे प्रमाण वाढू लागले आहे. नुकतेच, राजगुरुनगर (खेड) तालुक्यातील , एका आदिवासी ठाकर कुटुंबातील, गरीब विद्यार्थिनी हिने आपल्या कष्टाच्यां जोरावर रशियामध्ये वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले होते. तिची ही कामगिरी नक्कीच अभिनंदन व कौतुकास्पद आहे.तसेच तिची ही कामगिरी,इतर मुला-मुलींना प्रेरणास्पद अशी होती.

या पार्श्वभूमीवर, संस्थेच्या वतीने दिनांक १३ जुलै,२०२२ रोजी, संबंधित युवतीच्या राजगुरुनगर येथील घरी जाऊन, तिचा विशेष सन्मान करण्यात आला.यावेळी, संस्थेचे कार्यकारी मंडळातील सदस्य डॉ. हनुमंत भवारी, याचबरोबर आंबेगाव व राजगुरुनगर तालुक्यातील विविध सामाजिक संस्था,संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



# वर्तमान पत्रातील कात्रणे

## घोडेगावात निराधार, विशेष व्यक्तींचे सर्वेक्षण



घोडेगाव (ता. आंबेगाव) : येथे झालेल्या कार्यक्रमावेळी उपस्थित मान्यवर आणि विद्यार्थी.

**मंचर, दि. ४ (प्रतिनिधी)** - आंबेगाव तालुक्यातील निराधार, विशेष व्यक्तींचे सर्वेक्षण करून त्यांचे मूलभूत प्रश्न समोर आणण्यासाठी बी. डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव यांच्या सहकार्याने घोडेगाव (ता. आंबेगाव) येथे विशेष कार्यक्रम झाल्याची माहिती प्राचार्य डॉ. इंद्रजित जाधव यांनी दिली.

प्रभात अँकर स्टोरी

आदिम संस्कृती, अभ्यास, संशोधन व मानव विकास केंद्र या संस्थेच्या माध्यमातून पुणे जिल्ह्यातील आदिवासी, ग्रामीण भागात विविध संशोधनपर व रचनात्मक काम सुरू आहे. आदिवासी, दलित, महिला, श्रमिक, तसेच विविध कष्टकरी समुदायाच्या प्रश्नांविषयी संस्थेच्या माध्यमातून शास्त्रीय पद्धतीने अभ्यास केला जातो. या अभ्यासातून जे निष्कर्ष समोर येतात आणि जी वास्तवता समोर येते ती समाजासमोर व प्रशासकीय

### काळे महाविद्यालयाचा विशेष उपक्रम

यंत्रणेसमोर आणून या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी संस्थेच्या माध्यमातून,व समविचारी संस्था, संघटना यांच्या वतीने घोडेगाव (ता. आंबेगाव) येथे कार्यक्रम पार पडला. सर्वेक्षणाचे काम करणारे प्राचार्य डॉ. इंद्रजीत जाधव, उपप्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर, आदिम संस्थेचे डॉ. अमोल वाघमारे, राजू घोडे, दिव्या जाधव यावेळी उपस्थित होते. डॉ. इंद्रजीत जाधव यांनी सर्वेक्षणाचे महत्त्व समजावून सांगितले.

यावेळी उपस्थित मुलांपैकी,प्रातिनिधिक मनोगते तेजल विरणक, तेजल फलके यांनी मांडली. यावेळी उल्लेखनीय काम करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. सूत्रसंचालन कल्याणी गुंजाळ यांनी केले, तर अंकिता सैद यांनी आभार मानले.

प्रभात Tue, 05 April 2022 https://epaper.eprabhat.net/c/67258362



घोडेगाव येथे कार्यक्रमप्रसंगी बोलताना सहायक गटविकास अधिकारी अर्चना कोल्हे.

## महात्मा फुले यांचे कार्य दिशादर्शक

**मंचर :** महात्मा जोतिराव फुले यांचे कार्य आजही दिशादर्शक आहे. या पुढील काळातही महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या विचारांची गरज आहे, असे मत आंबेगाव तालुका पंचायत समितीच्या सहायक गटविकास अधिकारी अर्चना कोल्हे यांनी व्यक्त केले. महात्मा फुले यांच्या जयंती दिनानिमित्त आदिम संस्कृती, अभ्यास, संशोधन व मानव विकास केंद्र या संस्थेच्या वतीने घोडेगाव (ता.आंबेगाव) येथे प्रतिमापूजन करून अभिवादन करण्यात आले. त्यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून कोल्हे बोलत होत्या. कार्यक्रमाला किसानसभेचे तालुका उपाध्यक्ष राजू घोडे, शंकर काठे, अशोक जोशी, डॉ. अमोल वाघमारे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंकिता सैद, प्रास्ताविक शंकर काठे व आभार नंदन लोंढे यांनी मानले. कार्यक्रमाचे संयोजन, दिव्या जाधव, नंदन लोंढे, दुर्गा गुप्ता, रचना अकोलकर, वैष्णवी सहाणे, अंकिता सैद, तेजल विरणक यांनी केले.

## नवराष्ट्र

## 'शाहू महाराज हेच आरक्षणाचे जनक'



**मंचर, (वा.) :** राज्याच्या वैचारिक, सामाजिक जडणघडणीत छत्रपती शाहू महाराज यांचे विशेष योगदान आहे. शाहू महाराज हेच आरक्षणाचे जनक आहेत, असे गौरोद्गार घोडेगाव येथील बी. डी. काळे महाविद्यालयाच्या प्रा. डॉ. चांगुणा कदम यांनी व्यक्त केले. छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधत घोडेगाव येथे आदीम संस्था, किसान सभा व एसएफआय यांच्यावतीने आयोजित व्याख्यानात त्या बोलत होत्या. प्रा. प्रवीण पारधी, आदीम संस्थेचे डॉ. अमोल वाघमारे, किसान सभेचे अमोल गिरंगे, संदीप काठे, शंकर काठे, एसएफआयचे अविनाश गवारी आदी उपस्थित होते. प्रा. डॉ. कदम यांनी शाहूमहाराज यांचे लोककल्याणकारी कार्य या विषयावर सविस्तर मांडणी केली. सूत्रसंचालन सत्यपाल कांबळे यांनी केले. आभार नंदन लोंढे यांनी मानले.

Pune Plus Edition
09 May 2022 Page No. 3
epaper.navarashtra.com



घोडेगाव (ता. आंबेगाव) : ग्रामीण रुग्णालयातील परिचारिका सुषमा घोडे यांचा परिचारिका दिनानिमित्त सन्मान करण्यात आला.

## घोडेगाव ग्रामीण रुग्णालयात परिचारिका दिन साजरा

**मंचर, दि. १४ (प्रतिनिधी)** - ग्रामीण रुग्णालय घोडेगाव (ता. आंबेगाव) येथे जागतिक परिचारिका दिन साजरा करण्यात आला. यावेळी येथे कार्यरत असणाऱ्या परिचारिका सुषमा घोडे यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

आदिम संस्थेच्या वतीने, जागतिक परिचारिका दिनानिमित्त घोडेगाव येथे कार्यक्रमात ग्रामीण रुग्णालयाचे डॉ. गणेश शेंगाळे व प्रा. सागर पारधी यांच्या हस्ते परिचारिका सुषमा घोडे यांना क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा फोटो, पुष्पगुच्छ व पुस्तक देऊन सन्मानित करण्यात आले. सार्वजनिक किंवा खासगी आरोग्य व्यवस्थेत, परिचारिकांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. याचबरोबर करोना संसर्गजन्य आजाराच्या संकटकाळात परिचारिकांचे कार्य उल्लेखनीय ठरले आहे. त्यांनी या काळात दिलेली सेवा महत्त्वाची ठरली आहे, असे मत यावेळी डॉ. शेंगाळे यांनी व्यक्त केले.

यावेळी, किसान सभेचे राजू घोडे, एसएफआय संघटनेचे पुणे जिल्हा अध्यक्ष अविनाश गवारी, आदिम संस्थेचे नंदन लोंढे, अर्चना गवारी, ग्रामीण रुग्णालयाच्या ज्योती वाळुंज उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि आभार अविनाश गवारी यांनी मानले. कार्यक्रमाचे संयोजन अनिल सुपे, नंदन लोंढे, अर्चना गवारी यांनी केले.

प्रभात Sun, 15 May 2022 https://epaper.eprabhat.net/c/6

केसरी

# आपटी येथे पाण्याच्या टाकीचे उद्घाटन



**भीमाशंकर, (वार्ताहर) :** रोटरी क्लब निगडी, ब्रिजस्टोन इंडिया कंपनीच्या सहकार्याने व स्थानिक संयोजनातून आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम दुर्गम भागातील आपटी येथे नळपाणी पुरवठा व पिण्याच्या पाण्याच्या नवीन टाकीचे उद्घाटन रोटरी क्लबचे जगमोहन सिंग यांच्या हस्ते करण्यात आले.

आपटी गावातील महिलांना अर्धा किलोमीटर असलेल्या विहिरीवर जाऊन पाण्यासाठी डोक्यावर हंडे घेऊन पायपीट करावी लागत होती. महिलांची होणारी ही पायपीट थांबविण्यासाठी रोटरी क्लब व ब्रिजस्टोन कंपनी यांच्या सहकार्याने आपटी गावात २० हजार क्षमतेची आरसीसी पाण्याची टाकी बांधण्यात आली. टाकीत विहिरीतून विद्युत मोटारने पाणी सोडण्यात आल्यानंतर त्यातून घरघरांत नळपाणी पुरवठा सुरू करण्यात आला. त्यामुळे ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे. यावेळी रोटरी क्लबचे अंकाजी पाटील, राणू सिंघानिया, राकेश सिंघानिया, आदिम संस्थेचे डॉ. अमोल वाघमारे, राजू घोडे, अविनाश गवारी, राजेश गवारी सह ग्रामस्थ उपस्थित होते.

नवराष्ट्र

**▮ वैद्यकीय अधिकारी सुरेश ढेकळे यांचे मत ▮**

# आरोग्य व्यवस्था सक्षम व्हावी

**मंचर, (वा.)** सार्वजनिक आरोग्य व्यवस्था ही सक्षम व गुणवत्तापूर्ण व्हावी यासाठी शासनाचे विविध प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी लोकसहभाग महत्त्वाचा आहे, असे मत आंबेगाव तालुक्याचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सुरेश ढेकळे यांनी व्यक्त केले.

घोडेगाव (ता. आंबेगाव) येथे साथी संस्था पुणे व आदीम संस्था, आंबेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने, आरोग्य उपकेंद्र ,आरोग्यवर्धिनी केंद्र यांची भूमिका व कार्य यांची सविस्तर माहिती देणाऱ्या विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी डॉ. ढेकळे बोलत होते. डॉ. ढेकळे पुढे म्हणाले, जनतेने सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेत सकारात्मक हस्तक्षेप करून गावपातळीवरील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था सक्षम करणे गरजेचे आहे. जनतेला याविषयी योग्य ती माहिती व प्रशिक्षण उपलब्ध झाल्यास जनता स्वतः पुढाकार घेऊन आरोग्यवर्धिनी केंद्राच्या बदलासाठी पुढाकार घेईल.



## आरोग्यवर्धिनी केंद्राच्या कार्याची माहिती

1 या कार्यशाळेत आरोग्यवर्धिनी केंद्राची भूमिका, कार्ये, जनआरोग्य समितीची पार्श्वभूमी, तिची रचना व तिचे कार्य याविषयी सविस्तर माहिती, कम्युनिटी ॲक्शन फॉर हेल्थचे राज्य समनव्यक हेमराज पाटील व साथी संस्थेचे समनव्यक भाऊसाहेब आहेर यांनी दिली.

2 याप्रसंगी आदीम संस्थेचे डॉ. अमोल वाघमारे, किसान सभेचे अशोक पेकारी, राजू घोडे, सुभाष भोकटे, दत्ता गिरंगे, एसएफआयचे अविनाश गवारी, दीपक वाळकोली, जनवादी महिला संघटनेच्या देविका भोकटे, आशा लोहकरे, संगीता शेळके आदी उपस्थित होते. संयोजन अनिल सुपे, शंकर काठे, नंदन लोंढे, दिव्या जाधव, अर्जुन काळे यांनी केले. सूत्रसंचालन व प्रास्ताविक राजू घोडे यांनी केले. आभार नूतन क्षीरसागर यांनी मानले.

Pune Plus Edition
07 May 2022 Page No. 2
epaper.navarashtra.com

सायं दैनिक ज्योतिर्गमय

* www.jyotirgamay.in * अमरावती, रविवार दि.०३ जुलै २०२२

# साक्षरता वर्गात महिला गिरवत आहेत शिक्षणाचे धडे

कैलास गायकवाड



**आंबेगाव :** आदिवासी ठाकर समाजात आजही शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. याबाबत आदिम संस्थेने आंबेगाव तालुक्यातील आदिवासी ठाकर समाजातील सुमारे २९८ कुटुंबाचे सर्वेक्षण केले होते.या कुटुंब प्रमुखा पैकी ४४ टक्के कुटुंब प्रमुख निरक्षर आढळून आले. या पार्श्वभूमीवर संस्थेच्या वतीने औपचारीक शिक्षण विषयक काम सुरू करण्यात आले आहे.आमोंडी ता.आंबेगाव जिल्हा पुणे या गावातील एका ठाकर वस्तीवर मागील सुमारे दोन महिन्यापासून साक्षरता वर्ग सुरू करण्यात आला आहे. या साक्षरता वर्गासाठी रोटरी क्लब कोथरूड पुणे यांचे सहकार्य लाभले आहे. तर माध्यम सहजतेने स्थानिक सहकार्याचे काम केले आहे. तसेच संयोजन केले आहे. सदर साक्षरता वर्गा मध्ये सर्व शेतमजुरीचे काम करणाऱ्या आदिवासी ठाकर महिला शिक्षण घेत आहेत. ,या दिवसभर गुरेढोरे संभाळून, शेतमजूरीचे काम करून,व घरातील सर्व कामे करून,रात्रीच्या वेळी साक्षरता वर्गात येऊन शिक्षण घेत आहेत.सदरील साक्षरता वर्गात महिलांना आता स्वतःचे नाव लिहता-वाचता येत आहेत.पण त्या बरोबरच थोडे थोडे लेखन वाचन ही येऊ लागले आहे. व्यवहार, दैनंदिन कामकाजाची ही माहिती होत आहे. तसेच राज्य व देशातील घडामोडी याची माहिती देत आहेत. या साक्षरता वर्गात महिलांना शिकवण्याचे काम शारदा केदारी या स्वयंसेवीका करत आहेत. या सामाजिक कामात स्थानिक वस्तीवरील शिक्षित युवक-युवती मदत करत आहे. आदीम संस्थेचे अनिल सुपे, अविनाश गवारी व बाळू काठे हे समनव्याचे काम करत आहे. तर आदिवासी ठाकर समाज समनव्य समितीचे अर्जुन काळे,सुभाष पारधी हे ही सहकार्य करत आहेत. या पुढील काळात साक्षरता वर्गात आर्थिक, कायदा साक्षरता, आर्थिक साक्षरता, आरोग्य साक्षरता याविषयी माहिती दिली जाणार आहे.



घोडेगाव (ता. आंबेगाव) : ग्रामीण रुग्णालयातील परिचारिका सुषमा घोडे यांचा परिचारिका दिनानिमित्त सन्मान करण्यात आला.

# घोडेगाव ग्रामीण रुग्णालयात परिचारिका दिन साजरा

**मंचर, दि. १४ (प्रतिनिधी)** - ग्रामीण रुग्णालय घोडेगाव (ता. आंबेगाव) येथे जागतिक परिचारिका दिन साजरा करण्यात आला. यावेळी येथे कार्यरत असणाऱ्या परिचारिका सुषमा घोडे यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

आदिम संस्थेच्या वतीने, जागतिक परिचारिका दिनानिमित्त घोडेगाव येथे कार्यक्रमात ग्रामीण रुग्णालयाचे डॉ. गणेश शेंगाळे व प्रा. सागर पारधी यांच्या हस्ते परिचारिका सुषमा घोडे यांना क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा फोटो, पुष्पगुच्छ व पुस्तक देऊन सन्मानित करण्यात आले. सार्वजनिक किंवा खासगी आरोग्य व्यवस्थेत, परिचारिकांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. याचबरोबर करोना संसर्गजन्य आजाराच्या संकटकाळात परिचारिकांचे कार्य उल्लेखनीय ठरले आहे. त्यांनी या काळात दिलेली सेवा महत्त्वाची ठरली आहे, असे मत यावेळी डॉ. शेंगाळे यांनी व्यक्त केले.

यावेळी, किसान सभेचे राजू घोडे, एसएफआय संघटनेचे पुणे जिल्हा अध्यक्ष अविनाश गवारी, आदिम संस्थेचे नंदन लोंढे, अर्चना गवारी, ग्रामीण रुग्णालयाच्या ज्योती वाळुंज उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि आभार अविनाश गवारी यांनी मानले. कार्यक्रमाचे संयोजन अनिल सुपे, नंदन लोंढे, अर्चना गवारी यांनी केले.

प्रभात Sun, 15 May 2022 https://epaper.eprabhat.net/c/6

# 'आरोग्य व्यवस्थेचे सोशल ऑडिट व्हावे'

**मंचर, दि. ९ (प्रतिनिधी)** - घोडेगाव (ता. आंबेगाव) येथे साथी संस्था, किसान सभा व आदिम संस्थेच्या वतीने आरोग्य व्यवस्थेचे सोशल ऑडिट या विषयीच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. लोकसहभागातून सोशल ऑडिट कसे करावे, याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

प्राथमिक आरोग्य केंद्र आणि त्याअंतर्गत येणारी आरोग्यवर्धिनी केंद्र यामधून मिळणारी आरोग्य सुविधा रुग्णांना चांगल्या प्रकारे मिळावी, कर्मचारी आणि रुग्णांमध्ये सुसंवाद निर्माण व्हावा, या पार्श्वभूमीवर जन आरोग्य समित्या आरोग्यवर्धिनी केंद्रामध्ये स्थापन करण्यात आलेल्या आहेत. या जन आरोग्य समित्यांचे सदस्य, अध्यक्ष, सचिव यांचे प्रशिक्षण होऊन त्यांनी आपले आरोग्यवर्धिनी म्हणजेच आरोग्य उपकेंद्र सक्षमीकरण करणासाठी नियोजन आणि नियंत्रण करणे गरजेचे आहे. या आरोग्यवर्धिनी केंद्राचे लोकसहभागातून सोशल ऑडिट होणेही आवश्यक आहे. साथी संस्थेच्या पुढाकाराने ही कार्यशाळा झाली, तर स्थानिक संयोजन किसान सभा, आंबेगाव तालुका समिती आणि आदिम संस्था यांनी केले होते. यावेळी मार्गदर्शक भाऊसाहेब आहेर यांनी वेगवेगळ्या उदाहरणांमधून सरकारी दवाखान्यांचे, तसेच रुग्णाचे, कर्मचाऱ्यांचे अनुभव सांगितले. लोकसहभागातून ऑडिट प्रक्रिया करताना त्या विभागाची संपूर्ण माहिती अभ्यासावी, कोणते मुद्दे महत्त्वाचे आहेत हे शोधावे अशी क्रमवार माहिती त्यांनी दिली. याप्रसंगी किसान सभेचे राजू घोडे यांनी सार्वजनिक आरोग्य व्यवस्था सक्षम करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे असे नमूद केले. या कार्यशाळेसाठी हिना कौसर खान, समन्वयक साथी संस्था, शिनोलीचे सरपंच मंगेश पारधी, वामन बाजारे, तसेच अर्जुन काळे, संदीप केवाळे, बाळू काठे, देविका भोकटे, रेश्मा गिरंगे, अनिल सुपे उपस्थित होते. सूत्रसंचालन अशोक जोशी, प्रास्ताविक राजू घोडे यांनी, तर आशा लोहकरे यांनी आभार मानले.

# गोहेतील शिबिरात मिळाले निसर्ग उपचार

**मंचर, दि. २५ (प्रतिनिधी)**- पुणे येथील राष्ट्रीय निसर्गोपचार संस्थेच्या वतीने गोहे बुद्रुक (ता. आंबेगाव) येथे निसर्ग उपचार तपासणी शिबिर संपन्न झाले.

नुकतेच डॉ. शेखर बेंद्रे आरोग्य केंद्र म्हाळुंगे तर्फे आंबेगाव येथे निसर्गोपचार तपासणी व उपचार शिबिर पार पडले. यावेळी, पॅरेलिसेस, सांधेदुखी, गुडघेदुखी, कंबरदुखी व इतर आजार होते. अशा रुग्णांची तपासणी केली व सर्व रुग्णांची मसाज करण्यात आली. तसेच यातील काही रुग्णांवर पुढील उपचार गोहे येथील निसर्गोपचार केंद्रात केले जातील. असे नियोजन करण्यात आले. यावेळी रूग्णांना आरोग्याबाबतचे व योगाबाबतचे पुस्तिका वाटप करण्यात आले. निसर्ग उपचार केंद्र गोहे बुद्रुक येथील डॉ. शिवकेश व येथील विद्यार्थी व इतर साहाय्य करणारी या केंद्राची टीम यावेळी उपस्थित होते. या शिबिराचे संयोजन डॉ. शेखर बेंद्रे आरोग्य केंद्र व अखिल भारतीय किसान सभा आंबेगाव तालुका समिती यांनी केले होते. स्थानिक नियोजन अशोक जोशी, संदिप केवाळे, हिरा पारधी इत्यादि कार्यकर्ते यांनी केले होते.

नवराष्ट्र

# आदिवासींना सौरदिव्यांची भेट

## इनरव्हिल क्लब ऑफ निगडी प्राइडचा उपक्रम

मंचर, (वा.) आंबेगाव तालुक्यातील आदिवासी भागातील व काही ठाकरवस्ती येथील ज्या कुटुंबाच्या घरी अद्याप वीज नाही. अशा सुमारे ७० कुटुंबांना नुकतेच सौर दिव्यांचे वाटप करण्यात आले. इनरव्हिल क्लब ऑफ निगडी प्राइड यांच्या सहकार्याने व आदिम संस्था आंबेगाव यांच्या स्थानिक समन्वयातून हा कार्यक्रम घोडेगाव येथे पार पडला. प्रमुख पाहुणे म्हणून घोडेगावचे पोलीस उपनिरीक्षक सतीश डौले व सामाजिक कार्यकर्ते डॉ.विलास काळे उपस्थित होते. सूत्रसंचालन बाळू काठे यांनी केले. प्रास्ताविक डॉ. अमोल वाघमारे व आभार राजू घोडे यांनी मानले. संयोजन अशोक जोशी, दत्ता गिरंगे, अविनाश गवारी, दिपक रड्डे, आशा लोहकरे, रोहिदास गभाले, अर्जुन काळे, अनिल सुपे, पुंडलिक असवले यांनी केले होते.



### पुस्तकांच्या प्रती भेट

या सौर दिव्यांबरोबरच वाचन संस्कृती घरोघरी पोहचावी म्हणून राज्य साधन केंद्र पुणे या संस्थेच्यावतीने पुस्तकांची एक-एक प्रत यावेळी या कुटुंबास देण्यात आली. अध्यक्षस्थानी इनरव्हील डिस्ट्रिक्टच्या चेअरमन मुक्ती पानसे या होत्या. यावेळी पदाधिकारी सुजाता ढमाले, डॉ. रंजना कदम, सुवर्णा जांभळकर, दिपाली जाधव, सुरेखा परिहार व ऐश्वर्या ढमाले आदी उपस्थित होत्या.

Pune Plus Edition
24 October 2022 Page No. 2
epaper.navarashtra.com